# चैतन्य लहरी

## मराठी आवृत्ति

खंड ४ अंक ६ व ७



सर्वशक्तिमान परमेश्वर आहे आणि त्या परमेश्वराचा मी दूत आहे ह्या देवावरचा विश्वास जेव्हा तुमच्यामध्ये पूर्णपणे प्रस्थापित होतो त्यावेळी तुम्ही गुरुपदामध्ये असता.

**– प. पू. श्री. माताजी निर्मलादेवी**

गुरुपूजा, १९९२, कबेला, इटली

# चैतन्य लहरी

## अनुक्रमणिका


१) श्री गणेश पूजा

२) महालक्ष्मी पूजा

३) महासरस्वती पूजा

४) गुरुपूजा

५) शिवपूजा १९८७

# श्री गणेश पूजा

## (सारांश) पर्थ, ऑस्ट्रेलिया, फेब्रुवारी १९९२

''परत ऑस्ट्रेलियामध्ये असणं, किती आनंददायी आहे. इथे जाळून टाकण्याइतकं उकडत होतं, ''आतां तुम्ही पाहीलंत, तुम्हाला हवं होतं, म्हणून सारखा पाऊस पडत राहीला आणि तुम्हाला गार वातावरण हवं होतं. दोन्ही गोष्टी कार्यान्वित झाल्या आहेत. त्यानंतर होती काळजी, पावसामुळे साधक येणार नाहीत याची. पण ती चांचणीच होती, त्यामुळे तो प्रश्नदेखील सुटला. मी त्यांना म्हटलं, जे खरे साधक आहेत ते येतील. नाहीतर मोठी संख्या असून जर साधना नसेल तर, त्याचा काय उपयोग? आणि साधक फार गहनतेमधले. एक प्रश्नही त्यांनी विचारला नाही. तुम्ही कल्पना करू शकतां कां? ऑस्ट्रेलियामध्ये माझ्यावर नेहमीच प्रश्नांचा भडीमार केला जातो. पण त्यांची साधना मला इतकी जाणवली कीं, मी म्हटलं, 'मला तुम्ही प्रश्न विचारलेले बरे, आणि एकही प्रश्न विचारला गेला नाही, त्यामुळे एका दमांत मी किती गोष्टी केल्या.'

कार्यक्रमाच्यावेळी वीज गेली, त्याचाही परिणाम चांगला झाला. कारण, आपल्याला मेणबत्त्या वापराव्या लागल्या, आणि सगळी भुतं मेणबत्त्यांबरोबर एकत्र आली. श्री माताजी खोलीमध्ये आल्या, त्यावेळी हे झालं. वीजेवर इतकं अवलंबून असणं, काही चांगली गोष्ट नाही, हे समजणंसुद्धा फार महत्त्वाचं होतं. ''त्यामुळे कांही नैसर्गिक गोष्टींचा आपण नेहमीच सांठा करून ठेवला पाहिजे. कांही कंदील वगैरे आपण तयार ठेवले पाहिजेत. आणि मी या विजेपेक्षां निसर्गाबरोबर जास्त राहिलं पाहिजे. मी सांगते, आपले डोळे खराब करायला ही वीज जबाबदार आहे. कारण नुसती ती आपल्याला उजेड देत नाही, आपल्या डोळ्यामधला प्रकाशही दूर नेते. त्यामुळे जास्त विजेने आपल्याला गुलामासारखंच बनविलं आहे. रहाण्यासांठी नैसर्गिक वातावरण ठेवण्याचा सध्याचा कल चांगला आहे.

जर परमचैतन्य ही देवाची प्रेमशक्ति आहे तर, ती समतोल साधते. त्यामुळे सहजयोगी जे, परमचैतन्य कार्यान्वित करणार आहेत. त्यांना त्यांच्या जीवनामध्ये समतोलता साधली पाहिजे. ही जागा आहे जिथे, मी म्हणते महागणेश रहातात. आपल्यामध्ये श्रीगणेश संतुलन साधतात. जेव्हां स्वस्तिक स्थिर असतं, त्यावेळी स्वस्तिक संतुलनाचं प्रतिनिधित्व करतं. ज्यावेळी ते योग्य दिशेने फिरू लागतं, त्यावेळी विधायक कार्य सुरू होतं आणि जीवनासांठी जे महत्त्वाचं ते सारं कांही ते कार्यान्वित करतं. पण जेव्हां ते उलट बाजूने सुरू होतं, त्यावेळी विघातक कार्य चालू होतं, हे दोन्ही संतुलनामध्ये असतात. जर नसले तर जीवन चालू रहाणार नाही. विधायक आणि विघातक दोन्ही संतुलनांत असले पाहिजेत.

जसं निसर्गांत आहे त्यानुसार जे निर्माण होतं त्याचा विनाशही होतो. परत कांहीतरी नवीन विधायकरित्या तयार होतं. आणि जे कांही तयार झालं असतं त्याचा भाग विनाश पावतो. त्यामुळे मृत्युमध्ये जीवन असतं, मृत्यु हा नसतोच, कल्पना करा, कधीपासून जन्मलेले ते सगळे लोक जर आज जिवंत असते तर आपण इथे नसतो. अनेक प्राणी मेलेले आहेत आणि ते सुद्धां मानव झाले आहेत. इतर लोकांनी या पृथ्वीवर यावं म्हणून अनेकांना मृत्यु यायला हवा आणि तुम्हाला थोडी विश्रांति घेऊन परत यायला हवं. तेव्हां मृत्यू हा फक्त जीवनामधला बदल आहे. मृत्यूशिवाय जीवन अस्तित्वात असूं शकत नाही. हे त्या दोघांमधील संतुलन आहे. त्यामुळे सहजयोग्याने मृत्यूला कधीच घाबरतां नये, जर तो मरण पावणार असेल तर, तो फक्त दुसऱ्या जीवनांत जाणार, जिथे तो थोडा वेळ विश्रांति घेऊन, जास्त उत्साहाने जोमाने आणि जास्त शक्तिने परत येणार आहे.

निसर्गामधल्या कितीतरी गोष्टी पूर्णपणे संतुलनामध्ये आहेत. ''जर हे संतुलन तुटलं तर आपण कुठेच रहाणार नाही. हे सर्व श्रीगणेशांनी केलं आहे, हे समजलं पाहीजे. या सर्व भौतिक गोष्टी आणि सर्व निर्मितीकडे ते लक्ष पुरवतात. उदा. पहिलं चक्र या पृथ्वी मातेने तयार केलं, आणि सगळं विश्व दुसऱ्या चक्राने केलं पण पहिलं चक्र ते आहे जे, आपल्या संतुलन देणारं पावित्र्य आणि मांगल्य प्रसारित करतं.

जेव्हां लोकाचं संतुलन जातं त्यावेळी ते डावीकडे किंवा उजवीकडे जातात. कांही सहजयोगी अत्यंत प्रामाणिक असतात, पण त्यांच्याकडे प्रेम नसतं. ''प्रेमाशिवाय प्रामाणिकपणाला कांही अर्थ नाही. प्रेम याचा अर्थ तुम्ही कशांत गुंतून रहावं असा नाही. पण तुमच्याकडे अलिप्त प्रेम व जबाबदारी हवी.'' श्रीगणेश मूलाधारावर आहेत आणि मूलाधारासंबधीत आपल्या सगळ्या जाणीवा ते काबूमध्ये ठेवतात. मुख्यतः विसर्जन. ''त्यामुळे गुंतून रहाण्यामध्ये विश्वास ठेवणारे लोक आपण नव्हे. किंवा त्याच्या अलिप्ततेमध्येही नव्हे पण संतुलनामध्ये आपला विश्वास आहे त्यामुळेच तुमचं लग्न झालं आहे. योग्य शारिरीक जीवन तुमच्याकडे आहे. तुम्हाला योग्य मुलं झाली पाहिजेत. अर्थपूर्ण, माननीय वैवाहिक जीवन तुम्ही व्यतित केलं पाहिजे पण तिथे प्रेम हवंच. पतिपत्नीमधलं प्रेम, मुलं व पालक यांच्यामधले प्रेम. आणि इतरांमध्ये सुद्धां. जर एक व्यक्ति असंतुलनामध्ये गेली तरी, पूर्ण कुटुंब असंतुलनामध्ये जातं. माधुर्याने कुटुंब चांगलं प्रस्थापित करणं, हीसुद्धां एक कला आहे. आणि जर दोघांनीही होकार दिला आणि आपण हे अशा प्रकारे करायचं असं म्हटलं तर, ते इतकं त्रासदायक होणार नाही

कारण तुम्ही सहजयोगी आहांत. आणि संतुलनाची गुणवत्ता तुम्हाला माहीत आहे.

पाश्चात्त्य देशांमध्ये समतोलपणा नाही कारण होमोसेक्स्युॲलिटीपासून सर्वसंगपरित्यागापर्यंत (जे जे. टी. एम्. मध्ये करतात आणि ते अनैसर्गिक असतं) सगळ्या प्रकारचे प्रश्न त्यांच्याकडे आहेत. "जर तुम्ही संतुलनांत नसाल तर, गोष्टी व्यवस्थित होत नाहीत. आणि तुम्ही एका बाजूला फार कांही होतां आणि दुसऱ्या बाजूला कांही नाही. आणि त्याप्रकारे लोकांना त्रास होतो.

आपण काय करीत आहोत ते गणेशचक्रामधून आपण समजावून घेतलं पाहिजे. कधीकधी आपल्याला गोष्टी गोळा कराव्या लागतात. कधी त्या वापराव्या लागतात. आणि कधीकधी टाकूनही द्याव्या. लागतात. "जेव्हा आपल्याला कुठूनही. विचार येतात तेव्हा आपल्यासांठी चांगलं असेल तेच फक्त आपण पचवावं आणि परमचैतन्यमुळें ते पचविलं जातं. बाकीचं टाकून दिलं जातं." उदा. कॅथलिकमंडळींपासून त्यातलं चांगलं ते, 'ख्रिस्ताची उपासना' घ्यावी पण निरर्थकपणा टाकून द्यावा. ख्रिश्चन लोकांनी व्यभिचाराच्या सर्व मर्यादा ओलांडल्या आहेत. तुमच्या मुलांचं काय होणार? तुमच्या समाजाचं काय होणार? सर्व समाज, ज्यामध्ये व्यभिचार ही जीवनपद्धति झाली आहे ते पूर्णपणे असंतुलनांत आहेत. आणि ख्रिस्ताच्या शिकवणीविरूद्ध जात आहेत.

"श्रीकृष्णांनी म्हटलं आहे, आत्मा हा प्रत्येकामध्ये वसतो. तर मग प्रत्येकजण सारखाच आहे. तुमच्याकडे जातींची पद्धत कशी असणार? तुम्ही जे काम करता त्याप्रमाणे जातीची पद्धत होऊ शकेल, पण जन्मांप्रमाणे जातींची पद्धत होणार नाही. प्रत्येकाकडे आत्मा आहे. त्यामुळे प्रत्येकजण उत्क्रांत होऊ शकतो. ख्रिस्तानेही तेच म्हटलं आहे. त्याने असं म्हटलं नाही कीं, स्त्रियांकडे आत्मा नाही आणि पुरूषांकडे आहे. धर्म, ज्याचा अर्थ संतुलन आहे, मध्यांत रहाणं आहे त्याच्याशी कांहीही संबंध नाही. तुम्ही जर मध्यांत असाल, गुरुत्वाकर्षणाच्या बिंदूवर असाल तर तुम्ही एकीकडून दुसरीकडे हलू शकत नाही. गुरुत्वाकर्षण पृथ्वीमातेकडून येतं आणि पृथ्वीमातेने श्रीगणेशांना तयार केलं आहे. "मानवाकडे नैसर्गिकरित्या हे गुरूत्वाकर्षण येतं ते दत्तक घ्यावं लागत नाही."

"मुलांना जर त्यांच्या बालपणांत त्यांचं गुरुत्वाकर्षण, माननीयता, त्यांची महती, याविषयी सांगीतलं तर खूप अभिमानाने ते ती विकसित करतील. हे गुरुत्वाकर्षण तुम्हाला एक प्रकारचं आकर्षण देतं. जो कोणी गंभीर असेल, गंभीर म्हणजे चेहरा गंभीर ठेवून नव्हे. गंभीर म्हणजे तुम्हाला सहज कोणीही विचलित करू शकत नाही. गांभीर्य याचा अर्थ कितीतरी गोष्टी होतो. आतां गणेशांच्या चरित्रावरून पहा. गांभीर्य म्हणजे मध्याला धरून राहाणारे, ते तुम्ही आहांत. ती व्यक्ति जी, सर्व कांही बघते, पण विचलित होत नाही; तिला मोह होत नाही. आत्मसंतुष्ट. कशाचीही मागणी करीत नाही, तिला कशाचीही गरज लागत नाही; सूड घेत नाही, क्षमा करते कारण, स्वतःच्या गांभीर्यामधून बाहेर येण्याचा त्याला मार्गच नसतो. ती तिथेच चिकटलेली असते." तशी व्यक्ति असंतुलनात असलेल्या अयोग्य गोष्ट करणाऱ्या माणसांमागे धांवत नाही तशा लोकांविषयी त्या व्यक्तिला दया वाटते. इतरांना घाबरविण्यासाठी किंवा त्यांचा नाश करण्यासांठी घट्ट रोवून उभं राहणंच पुरेसं असतं. "त्याला हलविता येणार नाही, अशा ठिकाणी तो उभा आहे पण इतर लोक विनाशाकडे धांवत आहेत तेव्हां त्यांच्या मागे धावून स्वतःचा नाश करून घेण्यांत काय अर्थ आहे? ते मदत करू पाहातील कारण, कोणीतरी खाली पडणार आहे ते ते पाहूं शकतात पण जर एखाद्या व्यक्तिला संतुलनामध्ये यायचं नसेल तर तुम्ही जबरदस्ती करूं शकत नाही.

गणेशांची सर्वांत महान गुणवत्ता ही आहे कीं त्यांना संतुलन आहे. त्या गुरुत्वाकर्षणामुळे ते या पृथ्वीमातेवर बसतात. ऑस्ट्रेलिया ही श्री गणेशांची भूमि आहे. त्यामुळे ऑस्ट्रेलियन लोकांना नैसर्गिकरित्या संतुलन हवं. पण त्यांना ते नाही. ऑस्ट्रेलियामध्ये सहजयोग सुरू करण्याआधी श्री माताजींचा त्यांच्या विषयीचा अनुभव असा होता कीं ते भरपूर पितात, असंबद्ध बोलतात, फार घट्ट हस्तांदोलन करतात. प्रत्येक गोष्ट मोठ्या प्रमाणांत करतात. श्री गणेशांची ही भूमि आहे परमचैतन्याबरोबर सुसंगत हवी. निसर्गामध्ये रहाणारी जनावरं पूर्णपणे देवाशी सांगड घालून असतात. देवाच्या पूर्ण ताब्यांत एकमेकांवर ते आक्रमण करीत नाहीत. ते फार हळूवार असतात. गट करीत नाहीत. "ते वाढतात. त्यांना जे कांही दिलं जातं त्याचा विनाशाचाही ते स्वीकार करतात.

श्री गणेशांच्या या देशामध्ये निसर्ग तुमच्यामध्ये प्रतिबिंबीत झाला पाहिजे आणि तुमच्यामध्ये अशाप्रकारे संतुलन आलं पाहिजे कीं, तुमचं सर्व आणि स्वभावाने तुमच्यामधील संतुलन दाखविलं पाहिजे. पण ऑस्ट्रेलियामध्ये सर्वात कठिण गोष्ट आहे ती ही कीं, "अनेक गट आहेत आणि लोक भांडतात आणि त्यांच्यामध्ये खूप प्रश्न असतात. जिथे गण आहेत त्या गणेशांच्या भुमींत, "जर गणांनी एकमेकांशी भांडायला सुरुवात केली तर शरीरामध्ये काय होइल? तर, तुम्ही गणांसारखे आहांत. या देशामध्ये जन्मलेले विशेष आशिर्वाद असलेले लोक. आणि हे सारं मिळवल्यानंतर स्वतःचा तोल हरवलेल्या अतिविकासित देशांकडून पूर्णपणे निरर्थक गोष्टी तुम्ही जर घेणार असाल तर, या गणेशाच्या भुमीमध्ये जन्म घेऊन फायदा काय? या गणेशाच्या भूमींत तुमच्यामधे तुमचं पूर्ण संतुलन हवं. ऑस्ट्रेलियाच्या सहजयोगीयांकडून मी ती अपेक्षा करते. आणि पूर्ण जगाला त्यांनी श्री गणेशांच्या संतुलनाची जाणीव दिली पाहिजे.

कोणाबद्दलही आपण मनामध्ये आढी ठेवता नये. आणि सदैव क्षमा करीत असलं पाहिजे. इंग्रजी भाषा जास्त मृदू नाही. "त्यामध्ये कोणी कांही म्हटल्यास मनावर घेता कामा नये. ती फार विनोदी भाषा आहे. पण कधी कधी विनोद तुम्हाला इजा करतो पण त्याचा अर्थ तुम्ही

कोणाला कठोर शब्द बोलावे असा नाही किंवा कोणाबद्दलही तुम्ही औदासिन्य दाखवावं असं नाही. तुमची कर्तव्यं तुमच्या मुलांबद्दलची, बायकोबाबतची, नवऱ्याबद्दलची, कोणाच्याही विषयी औदासिन्य असणं हेच अत्यंत कठोर आहे. छोट्याशा गोष्टीसाठी जर एखादीने रागावायचं, पतीशी बोलायचं नाही असं केलं; किंवा पतीने पत्नीकडे दुर्लक्ष केलं, तिची पर्वा केली नाही तर सहजयोगानुसार तो गुन्हा आहे. ती गोष्ट चूक आहे कारण तुमच्यामध्ये संतुलन असलं पाहिजे, निसर्गाचा हळुवारपणा असला पाहिजे इतरांशी तुम्ही खूप हळूवारपणे बोललं पाहिजे, दयाळू, आणि चांगलं आलं पाहीजे तुम्ही तसं करीत आहांत की नाही हे शोधून काढा."

"नंतर गटांमध्ये प्रेमशक्तिचा वापर करण्याचा प्रश्न आहे." ती एकच शक्ति आपल्याकडे आहे. "श्री गणेशांकडे बघा. ते किती शांत आहेत, गोड आहेत, किती अबोध आहेत. त्यांचे मार्ग किती हळूवार असतात. तुमच्यावर ते कसं काय कार्य करतात." उदा. फूल उमलतांना तुम्ही पहात नाही. निसर्गामध्ये श्री गणेशांनी केलेले कांहीही वाढतांना असतांना तुम्हाला दिसत नाही इतक्या हळूवारपणे ते सर्व कांही करतात. आणि पूर्ण जागांत प्रत्येक पान वेगळं करतात. "श्रीगणेशांच्या भूमीवर आपण जगत असतांना, लोकांशी व्यवहार करीत असतांना आपण किती हळूवार व्हायला हवं. लोकांशी व्यवहार करताना आपण अत्यंत हळूवार असायला हवं आपण गणेश आहोत हे दाखवायला - 'विशेषजण' - ऑस्ट्रेलियन लोकांविषयी मला तसं वाटतं.

"तुम्ही सर्वांनी प्रेमळ, हळूवार, दयाळू, कळकळ असलेलं बनायला खरोखर शिकायला हवं. छोट्या छोट्या गोष्टी लोकांना आनंदी करतात. खूप आनंदी. मी स्वतः जेव्हां या सर्व कृत्ता करते, तेव्हा तुम्ही सुद्धां त्या करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. फार साधं आहे ते. एके दिवशी एका स्त्रीला मी साडी दिली. ती म्हणाली, "माताजी मला हा रंग आवडतो ते तुम्हाला कसं कळलं. "कारण तुम्हाला मी बहुतेकवेळां हा रंग नेसलेला पाहिला आहे. त्यामुळे तुम्हाला हा रंग आवडतो हे मला माहीत आहे." "तुम्ही मला पाहिलं कां?" "अर्थात, मी तुम्हाला पाहिलं." तर अशा छोट्या गोष्टी तुम्ही पाहता. तिचं हृदय उचंबळून आलं. तिला जाणीव झाली कीं, माताजींचं आपल्याकडे लक्ष आहे कारण मी तिला पाहीलं. म्हणजे मी काय म्हणते आहे, मी तुम्हा सर्वांना पहाते. आणि मला कळकळ असल्याने मला तुमच्याबद्दल सर्व कांही माहीत असतं. मला तुमची काळजी असते. मला माहीत असलेल्या सगळ्यांची तुम्ही कोणत्या परिस्थितीमध्ये आहांत. तुमच्यामध्ये काय चुकलंय, काय केलं पाहिजे, तुम्हाला काय आवडतं, काय आवडत नाही. तसं करण्यांत कांहीच धोका नाही शक्यतो चांगली एकतानता साधून काय प्रश्न आहे ते समजावून घेणं चांगलं.

श्री माताजी म्हणाल्या, हळूवारपणे त्या लोकांना ठीक करण्याचा प्रयत्न करतात. पण आपण त्यांना सांगण्याची गरज नाही. त्यापेक्षां आपण त्यांना बंधन देऊ शकतो. लोकांना त्यांच्या तोंडावर सांगणं किंवा कांहीतरी एकदम जहाल करणं याची काळजी नको. ध्यान करणं मध्यांत रहायला मदत करतं. पण तरीसुद्धा आपण कधीकधी घसरतो. "ज्यावेळी अगदी आणिबाणीची वेळ येते त्यावेळी तुम्ही तुमच्या गुरुत्वाकर्षणाच्या बिंदूकडे येता. तसं झालं तर कांही प्रश्न नसतो. माझ्याबरोबर तसं होतं. जेव्हां मी कुठे एकादी संकटग्रस्त परिस्थिती पहाते तेव्हां मी माझ्या गांभीर्यामध्ये जाते आणि तिथून मला सर्व कांही स्वच्छ दिसतं आणि नंतर मी माझी अडचण सोडविते." तुम्ही इतरांशी तुलना करू नका किंवा तुम्हाला कांही मिळणार आहे किंवा मिळणार नाही, असा विचार करू नका." तुमचा स्वतःवर ताबा आहे तेव्हा तुम्ही काळजी करू नका. हेवे नाहीत, मोह नाही तुम्ही तिथे आहांत. तुम्हाला पर्वा नाही"

"कधीकधी लिडर्सना त्यांच्या नेतेपदाविषयी काळजी वाटते. आतां लिडरशीप हे नांवाला आहे. लिडरशीप हा एक चुटका आहे. आणि तो एक चुटका आहे हे तुम्हांला कळलं तर ते चांगल कार्यान्वित होइल सहजयोगामध्ये अधिकारपरंपरा नाही. आपण सगळे एक आहोत." कोणीही दुसऱ्यापेक्षां चांगला नाही." त्यामुळें कोणालाही लिडरशीपची भिती बाळगायला नको. तुम्ही जर तुमच्या ग्रॅव्हिटीमध्ये उभे असाल तर, तो तुम्हाला जाणून घेइल. लिडर जोवर स्वतःच्या गुरुत्वाकर्षणात असेल तोपर्यंत तो तिथे असेल, तुम्ही जेव्हां ग्रॅव्हीटीहून दूर व्हाल तेव्हां तो स्वतःहून बाजूला जाइल. तुम्ही तुमच्या ग्रॅव्हिटीपॉइंटवर उभं रहा. कोणीही तुम्हाला विचलित करणार नाही. सहजयोगामध्ये तुम्हाला भिती नको. कशाची काळजी नको. तुम्ही सगळे तर संतच आहांत. सगळे गण, सगळे देवदूत आणि आदिशक्ति तुमची काळजी घेते आहे. "ही भूमि गणेशांची आहे. सारं कांही कार्यान्वित होणार आहे."

"जो कोणी तुम्हाला त्रास देऊ पाहील त्याच्याकडे ही सर्वत्र असणारी शक्ति लक्ष देईल तुम्हांला त्याबद्दल कांही करायला नको." तुम्ही संतुलनात रहाल इतकं पहा. तुमच्या कुटुंबाशी फार जास्त चिकटून किंवा फार अलिप्त राहू नका. "अतिशय प्रेम म्हणजे प्रेमाचा मृत्यू. त्यामुळे हे अलिप्त प्रेम आपल्याला जाणून घेतलं पाहिजे, जिथे तुम्ही तुमच्या ग्रॅव्हीटीवर उभे रहातां आणि प्रत्येकाविषयी कळकळ बाळगता, प्रत्येकाचा विचार करता. जर कोणी नीट नाही असं दिसलं तर, तुम्ही तुमचं संतुलन हरवून बसत नाही. जर तुमचं संतुलन हरवलं असेल तर त्या व्यक्तिला तुम्ही कसं सांगणार? तशाप्रकारे तुमचा राग, लोभ, घृणा तुमची सारी चढाओढ सारी चढाओढ तुमच्यामधून निघून जाते कारण तुम्ही स्वतःच्या गौरवामध्ये असता. तुम्हाला कोणाकडून कौतुक नको असतं. तुम्ही तिथे असतां. आत्मसंतुष्ट असता."

श्रीमाताजीसमवेत मुद्दाम मुलाखत होण्याची आवश्यकता नसते. तो सगळा अहंकार असतो. श्री माताजी कधीही वैयक्तिक नसतात. पूर्ण वेळ त्या आपल्यासाठी असतात. "या सर्व गोष्टी अज्ञानामुळे होतात आणि तुम्ही तुमच्या गांभीर्याच्या बिंदूवर नसल्याने होतात. त्यामुळे आज आपल्या हृदयामध्ये आपण विचार केला पाहिजे की आपण घट्ट उभं राहिलं पाहिजे.

"देवाचे तुम्हाला आशिर्वाद."

# महालक्ष्मी पूजा

## (सारांश) ब्रिस्टेन, ऑस्ट्रेलिया २० फेब्रुवारी १९९२

विश्वनिर्मला धर्म म्हणजे काय आहे हे आपण समजून घ्यावं यासांठी महालक्ष्मी पुजा करण्यांत येत आहे.'' तुम्हा सर्वांच्यामध्ये मधोमध महालक्ष्मी तत्त्व असतं आणि एकदां कां तुम्ही लोकांचा दांभिकपणा, खोटेपणा याला कंटाळलात की तुम्ही अंतर्यामी सत्य शोधूं लागता. तशाप्रकारे नव्या वर्गवारीचे लोक जन्मले ज्यांना आपण 'साधक' म्हणतो. ते इतरांपेक्षा बरेच वेगळे असतात. भौतिक लाभ किंवा सत्ता, सामाजिक स्थान त्यांना पर्वा नसते. त्यांना सत्य शोधायचं असतं अणि तुम्ही या वर्गवारीमध्ये आहांत आणि त्यामुळेच तुम्ही सहजयोगामध्ये आला आहांत.''

आपल शोधणं आपल्या पूर्वजन्मांमधून येतं तसंच आपल्या सध्याच्या जीवनामधील परिस्थितीमधून येतं. जसं श्रीमंत घराण्यांत जन्म होऊन श्रीमंतीचा कंटाळा येणे किंवा भारतासारख्या देशांत जिथे, सत्य शोधण्याची परंपरा आहे, जिथे पैसा आणि सत्ता यांसाठी झगडणं हा खोटेपणा मानला जातो, आणि संस्कृतीमुळे लोकांना चांगल्या चालिरीती कंडीशनीग्ज असतात अशा देशामध्ये जन्म होणं. सत्य शोधणं ही एक फॅशनसुद्धां होऊ शकते. पण ती धोकादायक असूं शकते आणिअसे लोक हरवून जातात. जे लोक अंमलीपदार्थ, घेतात ते साधक असू शकतात. फॅशनसांठी ते अंमली पदार्थांचे सेवन करीत नसतात पण त्यांचं महालक्ष्मी तत्त्व त्यांना शोधायचं असतं. ''तर त्यांच्यामध्ये जन्मलेलं हे महालक्ष्मी तत्त्व एकप्रकारे व्यक्त होऊ लागलं कीं, या सर्वांच्या पलीकडे कांहीतरी असलं पाहिजे. प्रत्येक देशाच्या चालिरीती, रूढी, कंडिशनीग्जनींदेखिल सहजयोगाच्या तुमच्यामध्ये आणि बाहेर होणाऱ्या प्रगतीला अडथळे आणले आहेत.''

महालक्ष्मी तत्त्व समजण्यासांठी, आपल्याला आणशी दोन वाहिन्या आहेत ज्यांमध्ये आपल्या या आयुष्याच्या पार्श्वभूमीनुसार आपण उडी घेऊ शकतो हे आपल्याला ठाऊक असलं पाहिजे. ''पुर्वायुष्यामधील तुमच्या पार्श्वभूमीमुळे तुम्ही योग्य मार्गाला आलांत पण पूर्वायुष्य या आयुष्याने आच्छादिले आहे. समाजाने अनेक प्रकाराने तुमच्यावर प्रभुत्व गाजवले आहे. कार्यक्रमांसाठी येणारे अनेक लोक अनेक आयुष्यांचे साधक आहेत पण ते सहजयोगांत स्थिर होतील असं नाही, त्याचं कारण डाव्या आणि उजव्या बाजूकडच्या संवयी.'' सहजयोग्याला त्याचं महालक्ष्मी तत्त्व अबाधित राखण्यासाठी सदैव आत्मपरिक्षण केलं पाहिजे.'' आपली पारख करण्याचा सर्वांत उत्तम मार्ग म्हणजे आपली व्हायब्रेशन्स पहाणं. जेव्हां आपण इतके जास्त डाव्या किंवा उजव्या बाजूला जातो कीं आपले व्हायब्रेशन्स आपल्याला जाणवत नाहीत तेव्हां आपलं महालक्ष्मी तत्त्व काम करीत नसं. आपण रूळांवरून घसरलेले असतो. आपल्याला मध्यमार्गापासून बाजूला ओढणाऱ्या या कंडीशनीग्जबद्दल आपल्यामध्ये व इतरांमध्ये आपण नेहमी लक्ष ठेवलं पाहिजे, फार अलिप्तपणे आपण साक्षी राहीलं पाहिजे, स्वतःसाठी पाहिलं पाहिजे, इतरांविषयी नाही.

आपल्याला शारिरीक प्रश्न असले तर आपण मध्यांत नाही हे आपल्याल कळलं पाहिजे. आपण आपल्याला पूर्णपणे रोगमुक्त करूं शकले पाहिजे. आपण रागवतां नये, नेहमी शांत असलं पाहिजे. मध्यांत असलेली व्यक्ति आपण रागवलो असल्याचा देखावा करूं शकेल पण तो रोगामध्ये किंवा इतर कोणत्याही भावनेमध्ये गुंतणार नाही. ''तुम्ही पूर्णपणे अलिप्त आहांत याविषयी पहिल्यांदा तुमची खात्री पाहिजे. तुम्ही जर तुमचे स्वतःचे झाला तर तुम्ही स्वामी असता आणि तुम्ही कुठे जात आहांत हे तुम्ही पाहू शकतां.'' जर आपण डावीकडे, उजवीकडे जाऊ शकतो तर आपण पक्के सहजयोगी नाही आणि तिथे कांहीच प्रगति नाही.

आपलं महालक्ष्मी तत्त्व स्थित करण्यांसाठी मध्यावर असलं पाहिजे त्यासांठी लागणारी पहिली गोष्ट म्हणजे आपलं शरीर आपल्याला आनंदी वाटलं पाहिजे सुदृढ असलं पाहिजे. आपल्या शरीरांत होणाऱ्या वेदनांबद्दल सदैव तक्रार करीत आहोत असं नको. दुसरी गोष्ट, आपण जर मध्यात असलो तर आपलं चित्त जास्त निसर्गाकडे हवं कीं सगळं कसं काय कार्यान्वित होत आहे. आपल्या भोंवतालच्या निर्मितीचा आनंद आपण उपभोगला पाहिजे हा आनंद आश्चर्यजनकरित्या फार मोठा असतो आणि आपल्याला निर्विचार जाणीवेमध्ये घेऊन जातो.

आपण कोणत्याही धर्माला नांव ठेवतां नये पण जे लोक धर्माची तत्त्वे पाळीत नाहीत आणि आत्मसाक्षात्कारी नाहीत पण स्वतःला धार्मिक म्हणवतात त्यांना चर्चेसचा धिक्कार करता येइल पण ख्रिस्ताचा नाही. बायबलचा नाही. कधीच नाही. कोणत्याही अवतरणाचा, प्रेषिताचा किंवा धर्माचा आपण आपोआप आदर करतो. कधीच नापसंती दर्शवत नाही. कोणत्याही धर्माबाबत थोडाही आकस असतां नये. कोणत्याही धर्माने अजूनपर्यंत कांही अयोग्य केलेलं नाही. सत्ता आणि पैसा यासाठी धर्म वापरणाऱ्या लोकांनी चूका केल्या आहेत. ''विश्वनिर्मलधर्म जो महालक्ष्मी तत्त्वावर आधारित आहे तो सर्व धर्मांचं सार आहे. सर्व धर्मांचं सत्य आहे.''

बायबलमध्ये ख्रिश्चनिटीबद्दल पॉलने बराच जास्त गोंधळ निर्माण केला. 'कन्फेशन' (चूक कबूल करणे) सारखा निरर्थकपणा ज्यामुळे लोकांना दोषी वाटू लागतं तो, स्त्रीयांविषयीचा तुच्छतेची

वागणूक ही त्याने सुरू केली. त्याला ख्रिस्त माहीत नव्हता म्हणून त्याला हे असं करण्याचा अधिकार नव्हता. तो एक एपिलेप्टिक (अपस्माराचे झटके येणारा माणूस) होता. ज्याला सत्ता मिळण्यासांठी एक व्यासपीठ हवं होतं. त्यामुळे त्याने ख्रिश्चन धर्माला संघटित केलं. ख्रिस्ती धर्माला तुम्ही संघटित करा किंवा तुम्ही चुका कबूल करा किंवा दोषी वाटून घ्या वगैरे ख्रिस्ताने कधीच म्हटलं नव्हतं. "तो सदैव क्षमा करण्याविषयीच बोलत होता.

फार थोड्या काळांत ख्रिस्ताने आपल्याला सत्य दिलं पण जेव्हा त्याचा अर्थ लावण्यांत आला त्यावेळी ते चूकीचं झालं. "सहजयोगींचा दुसरा मुद्दा म्हणजे मी जे कांही म्हणते त्यांचा अर्थ त्यांनी लावण्याची गरज नाही. मी काय म्हणते आहे ते बरोब्बर त्यांना कळतं. जर ते अर्थ लावू लागले तर त्याच्याबाबत कांहीतरी चूक आहे. माझ्या म्हणण्याचा अर्थ तुम्ही लावू शकत नाही. जे कांही मी म्हणते, ते फार साध्या इंग्रजी भाषेत म्हणते. त्यामध्ये अर्थ लावण्यासारखं कांही नाही. मी सरळसरळ गोष्टी सांगते आहे. अर्थ लावण्याची गरज नाही." ज्या लोकांना असं वाटतं कीं त्याचा अर्थ लावण्याचा त्यांना मेंदू आहे त्यांना समजलं पाहिजे कीं, त्यांच्या मेंदूकडे त्याचा अर्थ लावण्याची योग्यता नाही. आपण मध्यामध्ये नाही, हे समजण्याचा हा एक मार्ग आहे.

आपण जेव्हा सहजयोगाविषयी भाषणं देतो तेव्हां अहंकारी बनणार नाही आणि श्री माताजींनी न सांगीतलेल्या गोष्टी सांगणार नाही याविषयी जागरूक राहीलं पाहिजे. जे लोक ठोस सहजयोगी नाहीत त्यांना आत्मसाक्षात्कार द्यावा पण सहजयोगाविषयी बोलू नये आणि तुम्हाला जो कोणी आत्मसाक्षात्कार देतो तो तुमचा गुरु नसतो त्याव्यक्तिबद्दल आत्यंतिक आदर किंवा उपकारांचे ऋण नको. तसं केलं नाही तर तुम्ही शेवटी त्या व्यक्तिचे किंवा त्या समुहाचे अनुकरण करीत डावीकडे किंवा उजवीकडे जाऊन पोहोचाल आपण जेव्हा महालक्ष्मी तत्त्वाबाहेर जातो तेव्हां आपल्या भोंवतालच्या निगेटिव्ह फोर्सेसच्या पकडीत जाऊन सर्वसामान्य लोकांपेक्षांदेखील वाईट होतो.

आपण कोणत्याही देशाचे नाही तर विश्वाचे आहोत. विश्वनिर्मलधर्म. "विश्वाचे आपण अंग प्रत्यंग आहोत. आतां आपण चिरंतन जीवनामध्ये गेलो आहोत. अमर्याद असलेल्या ठिकाणी गेलो आहोत." चिखलांतून वर येणाऱ्या कमळाप्रमाणे हळूहळू त्याला चिकटलेला सर्व चिखल बाहेर फेकतं, शेवटी अत्यंत स्वच्छफूल बाहेर येतं." आणि मग ते त्याचा सुगंध बाहेर पसरवतं ज्यामुळे चिखलालासुद्धा सुगंध येतो. ते आपलं कार्य आहे. हे महालक्ष्मीतत्त्व फक्त आपल्यासांठी नाही. तर पूर्ण जगासाठी आहे. आणि आपल्याला ते पूर्ण जगाला दिलं पाहिजे. आपण आलोकित अशी, सत्य व प्रेम यांवर आधारित, करूणामय अशी एक नवी जात, नवा समाज तयार करीत आहोत.

अध्यात्मिकरित्या पूर्ण साधनसामुग्रीने सज्ज असलेले लोक आपण बनलं पाहिजे. आणि आपण स्वतःकडे पाहिलं पाहिजे. आपण ठोस असायला हवं. कांहीच आपल्या मागे ओढू शकणार नाही. आपले व्हायब्रेशन्स सुस्पष्ट असावे. चक्र स्वच्छ असावी, आपण मध्यांत असावं, संतुलनांत असावं अशी इच्छा आपण केली पाहिजे. आपल्या स्वतःच्या प्रश्नांना तोंड देणं आपण चुकवतां नये आपण स्वच्छ आणि भरीव सहजयोगी असायला हवं. "सहजयोगामध्ये अनेकजण फार उच्च स्थरावर असू शकतात पण त्यांच्या इच्छा अजून पूर्णपणे व्यक्त झालेल्या नाहीत. मी तुम्हांला सांगितलेल्या अनेक गोष्टींचा नाउमेद करणारा परिणाम झाला आहे.

महालक्ष्मी तत्त्व हे आपल्यामधील ते तत्त्व आहे जे सर्व गोष्टींचं पोषण करतं आणि आपल्याला संतुलनामध्ये आणतं. ते तत्त्व, ज्या प्रेमावर आपलं जीवननिर्भर आहे, ते देवाविषयीचं प्रेम, समयोचित सूज्ञता आणि सत्य देणारं सर्व कांही कार्यान्वित करणारा मार्गदर्शक भाग आहे. "साधी गोष्ट तुम्ही करू शकता ती म्हणजे माझ्या कुंडलिनीवर असणं, नुसतं तुमचं चित्त तिथे ठेवा." निर्विचार होण्याने प्रश्न सोडविला जाइल कारण तिथे विचार नसेल. "त्यामुळे तुमचा अहंकार नक्कीच विरघळून जाइल. कारण मग तुम्हाला कळेल माताजी सर्व कांही करीत आहेत; मी कांही करीत नाही. तर मी त्याविषयी अभिमान कां बाळगावां? तसंच कंडिशनींग्जसुद्धा विरघळतील कारण माझी कुंडलिनी पूर्णपणे पवित्र आहे. ती कोणालाही चिकटलेली नाही. सहजयोगालादेखील ती चिकटलेली नाही. सर्वांच पोषण करण्याचं कार्य ती करते आहे. जर ती पोषण करीत असेल तर छान, उत्तम, आणि नसेल तरीही छान उत्तम."

तुमची इच्छा काय आहे, त्यावर ते अवलंबून असतं. कोणत्याही प्रकारे कोणीही तुमच्यावर जोर करणार नाही. गंगानदीसारखी कुंडलिनी वहात आहे आणि जर तुमची इच्छा असेल तर ती तुमच्यामध्ये वाहेल. "भक्ति ही इच्छा आहे. भक्तिचा आनंद मिळविण्यासांठी एकनिष्ठता. ती इतकी सुरेख गोष्ट आहे आणि आपण त्यामध्ये हरवून जातो. निर्विचारतेमध्ये तिचा आनंद लुटतो. "आणि तीच सर्वांत मोठी जबाबदारी, सर्वोच्च स्थिती आहे; जिथे तुम्ही देवत्त्वाशी ऐक्य साधता आणि आनंदाच्या सागरामध्ये पोहत असतां."

"हे महालक्ष्मी तत्त्व नेहमीच जतन करून ठेवलं पाहिजे. नेहमी पाहिलं पाहिजे, त्यावर लक्ष ठेवलं पाहिजे." महालक्ष्मीचे इतके अनेक आशिर्वाद आहेत कीं एका भाषणामध्ये सगळे सांगू शकणार नाही. पण सर्वात महान म्हणजे पूर्णपणे आत्मसंतोषी असणं. तुमच्या आत्यामध्ये तुम्ही आरामांत असता. जेव्हा महालक्ष्मी तत्त्व आपल्या मेंदूमध्ये प्रवेश करतं त्यावेळी विराटाचं प्रकटीकरण होतं, आपण फार सुरेखरित्या सामुहिक बनतो. त्यावेळी आपण कुठून नाही. "हा आनंद त्याच महालक्ष्मीतत्त्वामधून येतो जेव्हा तुमचं सहस्त्रार प्रकाशित होतं." जाणीव ही पूर्णत्वाची असते, व्यक्तिगत नसते. आपण पूर्णत्त्वाशी तादात्म्य पावलेले आहोत. आपण पूर्णत्त्वाचेच आहोत. तुम्हाला ती जाणीव अखंड शांती आणि समग्र संरक्षण देते. महालक्ष्मी तत्त्वाला शरण जाणं म्हणजे आपण आपले अहंकार आणि रूढी, चालीरिती कंडिशनींग्जचा त्याग करणं म्हणूनच महालक्ष्मी इतकी महत्त्वाची आहे.

# महासरस्वती पूजा

## (सारांश) ऑकलंड, न्यूझीलंड २३ फेब्रुवारी १९९२

महासरस्वती तत्त्व उजव्या बाजूला आहे. "पहिलं आहे ब्रह्मदेवाचं तत्त्व, जे सरस्वती तत्त्व आहे. त्यानंतर हे महासरस्वती तत्त्व जे तुम्हाला, महाब्रह्मदेवाचं तत्त्व जे 'हिरण्यगर्भ' त्याच्याकडे घेऊन जातं. जे सहजयोगी मंडळींना महत्त्वाचं आहे.

"जे लोक खूप विचार करतात किंवा जे लोक साक्षात्कार न घेता खूप निर्मिती करतात - सर्व प्रकारच्या कलांमध्ये - ते डावीकडे किंवा उजवीकडे अत्यंत टोकाला जातात." एखादा कलाकार फार उजवीकडे गेला कीं हळूहळू त्याची चित्रं खूप हिंसक बनतील. तो देखील फार करारी, जराही तडजोड न करणारा, स्वतःचीच पद्धत अनुसरणारा, दुसऱ्या कोणत्याही पद्धतीला न वापरणारा असा होइल. "आणि मग त्याला जेव्हां त्याचा कंटाळा येतो तेव्हां तो दुसरं कांही तरी ॲबस्ट्रॅक्ट आर्टसारखं वापरूं लागतो. पण साक्षात्काराविना ॲबस्ट्रॅक्ट आर्ट कांहीतरी विचित्र, मूर्खपणाची होऊ शकते."

सध्याचं 'पॉप म्युझिकदेखील, जे फार आक्रमक आहे ते अशाच प्रकारच्या परिणामांचं फळ आहे. कारण तुम्ही वर चढूं शकत नाही त्यावेळी तुम्ही उजवीकडे जाता. आणि ही लोकं, जी आधीपासूनच उजवीकडे आहेत त्या लोकांवर छाप मारतात. खऱ्या यशाची खूण लोकप्रियता नव्हे. ती तर येइल आणि जाइल. इतिहासावर तिचा ठसा उमटणार नाही.

इंग्रजी भाषेमध्ये शेक्सपिअरपासून सुरूवात केली तर अनेक लेखक आहेत. ज्यांनी मानवी प्रयत्नांची निष्फलता दाखविली आहे. ते अवधूतासारखे आहेत. "अध्यात्मिक जीवनामध्ये अतिशय विकास पावलेले. मानवी प्रयत्नांची निरर्थकता त्यांनी दिसते आणि ते लोकांना त्या बिंदूप्रत आणतात जिथे ते या मूर्ख, अमानुष प्रयत्नांच्यावर उठूं शकतील, ज्यायोगे मूर्ख अमानुष प्रयत्नांच्या ते वर उठूं शकतील त्या बिंदूला ते लोकांना आणतात जे त्यांना कांहीतरी उच्चतर आणून येइल, चिरंतन मूल्याची निर्मिती करेल अशा दुसऱ्या कोणत्याही कार्याकडे त्यांना नेतात. सॉमरसेट मॉम, क्रॉनिन वगैरेसारखे लोक मध्यामध्ये होते. पण नंतर जेव्हां हेमिंग्वे आला त्यावेळी तो उजवीकडे जाऊ लागला. आतां आधुनिक कादंबऱ्या ओंगळ, अश्लील भाषा आणि हिंसा यांनी भरलेल्या असतात. मानवी वापराला पूर्णपणे न रूचणाऱ्या असतात.

डावीकडे जाणारे कलाकार "सतत ग्रीक ट्रॅजेडीने त्रस्त झालेले असतात. सारखे रडत, अश्रू ढाळीत असतात, तुम्हालाही रडायला लावतात. काही डावीकडचे कलाकार खूप मद्य पिऊ लागतात. आणि रोमॅन्टिक प्रकारचे बनतात. दुःख आणि वेदनांच्या काल्पनिक जगामध्ये जगतात. आणि त्यांच्याकडे स्वतःच्या डाव्या बाजूचा उपयोग करून स्वतःच्या डोक्यांत निर्माण केलेल्या स्वतःच्या कल्पनेवर आधारित अद्भुतरम्य प्रतिमा असतात." भारतामध्येसुद्धां खूप मद्य पिणाऱ्या मुसलमानांनी गझल गायला सुरूवात केली. भेटीमध्ये नाही, योगामध्ये नाही तर ताटातुटीमध्ये ते गातात, "देवा, मी तुला कधी भेटणार?"

समाजदेखील उजव्या आणि डाव्या बाजूला हलत असतो. जेव्हां तो उजवीकडे जातो त्यावेळी त्यांना उजवीकडच्या गोष्टी आवडत असतात आणि डावीकडे जातो तेव्हा डावीकडच्या. "त्याचप्रमाणे दोन प्रकारच्या स्वभावाचे लोक असतात. तशा प्रकारे ते या गोष्टींचे रसग्रहण करूं लागतात. त्याचवेळी कांही लोक मध्यांत असतात. उदा टॉलस्टॉय आणि फ्रेंच लेखकांच्यामध्ये द मॉपासाँ प्रत्येक भाषेत आपल्याला त्याच प्रकारचे लोक दिसतात. पण मुख्यत्वे संस्कृत भाषेमध्ये लेखक मध्यांत होते. उजव्या किंवा डाव्या बाजूला नव्हते. "कारण असं कीं, साहित्यासांठी कांही नियम असतात. भारतांत पाश्चात्यांसारखी कल्पना नाही कीं आपण स्वैर, बेफिकीर लोक असले पाहिजे. त्याचा स्वीकार होत नाही. त्यामुळे साहित्यामध्येसुद्धां एक प्रकारचे निर्बंध आहेत. साहित्य म्हणजे काय? 'स' 'हित'. हितासह- हितकारी. जर ते हितकारी नसेल तर, ते साहित्य नव्हे. ते हलक्या दर्जाचे केरकच्यागत आहे. पण जेव्हां जर्मन किंवा जपानी लोक संस्कृत साहित्याला हात घालतात त्यावेळी ते कामसूत्राचं मोठं अवडंबर माजवितात. भारतीय विद्वान त्याला साहित्य म्हणून मान्यताही देत नाहीत. उजवीकडील लोकांसाठी ही अश्लील आणि वाईट निर्मिती भरपाईच आहे. उजवीकडची व्यक्ति मद्यप्राशन करील कारण त्याला सत्तेच्या तहानेची भरपाई करायची असते. किंवा उजवीकडची चळवळ मध्यांत आणावयाची असते. आधुनिक समाजांत लोक पांच दिवस अतोनात काम करतात. मग मद्यप्राशन करतात. प्राण्यांप्रमाणे झोपून घालवतात. सर्व पैसे वीकएन्डवर खर्च करतात. आणि सोमवारी मद्याच्या हँगओव्हरसह परततात. या टोकाकडच्या गोष्टी त्यांचे परिणाम दाखवू लागतात तेव्हा कलाकार कंटाळतात. आणि त्यांच्यामध्ये निर्मितीचा सूक्ष्मतर दृष्टीकोन तयार होतो. तो खरं ज्ञान शोधूं लागतो, देवत्त्वाचं गाणं गाणारं पवित्र ज्ञान. हा सर्व मूर्खपणा त्याला विचार करायला स्फूर्ति देतो कीं, आपण जास्त चांगल्या गोष्टी केल्या पाहिजेत. आणि मग महासरस्वती तत्त्व कार्यान्वित होतं. पण तेव्हांसुद्धां ते जेव्हा देवाबद्दल विचार करूं लागतांत तेव्हां सांपळ्यांत अडकतात. पैशावर आधारित किंवा सत्तेच्या दिशेने जाणारे धर्म ते अंगिकारल्याने कधीच आत्म्यावर आधारित होत नाहीत किंवा जर मानसिक व्यक्तिमत्त्व विकसित झालं तर, "त्यांनी कांही म्हटलं तरी त्याचा लोकांवर परिणाम

होत नाही कारण ते प्रकाशित लोक नसतात. देवाशी जोडलेले नसतात आणि ते जे कांही करीतात ते फक्त मनस्वी असतं."

त्यामुळे जेव्हा महासरस्वतीतत्त्व जागृत होतं तेव्हां सत्य काय आहे आणि मानसिक काय आहे. यांमधील फरक तुम्ही स्पष्टपणे पाहू शकता आणि कांहीतरी आणखी उच्चतर आहे हे समजूं शकता. "ते त्यांच्या स्वतःच्या (ज्या धर्मांत जन्मलेल्या) धर्मातील सर्व अध्यात्मिक लेखन वाचतात. आणि त्यांना कळतं की प्रत्येक धर्म तेच सांगतो नंतर ते जेव्हां आज्ञेच्या बिंदूला येतात. त्यावेळी अचानक त्यांना कळतं कीं, कांहीतरी चूक आहे; लोक फक्त मनाने या धर्माचा स्वीकार करीत आहेत आणि यापलिकडे कांही असलं पाहिजे. आणि या बिंदूवर, या मुद्द्यावर जर कोणाला त्याचा आत्मसाक्षात्कार मिळाला तर तो त्याला नुसता चिकटून रहातो.

सर्व गायक, वादक, कलाकार आणि त्या स्थितीप्रत पोहोचलेल्या लोकांमध्ये हे महासरस्वती तत्त्व जागृत झालं पाहिजे. आणि मग अचानक त्यांचा आत्मसाक्षात्कार त्यांना पटकन मिळतो. बरेच भारतीय वादक श्री माताजींकडे आले व त्यांची निर्मितीक्षमता वाढविण्यांसाठी त्यांना विचारलं. त्यांना जागृति दिल्यानंतर ते जगप्रसिद्ध झाले "वाचनाने, किंवा निर्मितीने किंवा लिहून किंवा इतर कशाने ज्यांनी महासरस्वतीची स्थिती मिळविली आहे. ते जेव्हां आज्ञेच्या ठराविक स्थितीला पोहोचतात तेव्हां, ते एकतर निराश होतात, डावीकडे जातात आणि हे सगळं निरर्थक आहे असा विचार करतात किंवा त्यांना साक्षात्कार मिळतो आणि ते फार प्रभावी कलाकार बनतात, प्रभावी लेखक किंवा चिरंतन मूल्य असणारं कांहीतरी निर्माण करणारे.

महासरस्वती तत्त्व तुम्हांला खूप सूक्ष्मतर बनवितं "आणि तुम्हांला कळूं लागतं कीं आपल्या निर्मितीबद्दल आपल्याला असलेली स्थूलरूपांतली जाण जास्त सूक्ष्मांत असायला हवी आणि तसे लेखक फक्त जे लोक सूक्ष्मांतलं जाणतात, त्यांनाच आकर्षित करूं शकतात." उदा. विल्यम ब्लेकला वेडा कवि म्हणूनच ओळखण्यांत येत होतं. सूक्ष्मतर ज्ञानाचा संपर्क साधण्याच्या आशेने ज्याने गीतेचं इंग्रजीमध्ये रूपांतर केलं त्या मॅस्करोने अशी पातळी गांठली जिथे त्याला त्याच्या स्वप्नामध्ये श्री माताजी दिसल्या आणि त्याने त्यांना ताबडतोब ओळखलं.

महासरस्वती तत्त्वाला आपण आपल्यामध्ये वाढूं दिलं पाहिजे. सहजयोगामध्ये आपल्याला कोणतंही पुस्तक वाचायला सांगता येत नाही पण जी कांही पुस्तकं आपण वाचतो त्यांत सूक्ष्म मुद्दे आपण पहातो. आणि स्वतःसाठी बघतो. बुद्धीवादी जे लिहितात ते कितीही खरंअसलं तरी त्यामधून कांहीही फैलावत नाही. "तो फक्त एक खेळ असेल बाहेर कांहीतरी होइल आणि ते गळून पडेल ते नैसर्गिक असायला हवं. ते तेव्हांच शक्य आहे जेव्हां, तुमच्या चित्तामध्ये आत्म्याचा प्रवेश होतो."

ज्यांचं महासरस्वती तत्त्व जागृत केलं गेलं आहे असे आत्मसाक्षात्कारी लोक असल्यामुळें आपण मौल्यवान पुस्तकं वाचली पाहिजेत. आणि त्यांच्यामध्ये सहजयोग कशाप्रकारे आहे ते समजावून घेतलं पाहिजे. ही सर्व पुस्तकं सहजयोगाच्या एकाद्या भागाविषयी बोलतात पण पूर्ण सहजयोगाविषयी नाही कारण, ती वेगवेगळ्या वेळी आली. सर्व धर्म कशाप्रकारे एकत्रित येऊन पूर्णत्त्व साधतात हे समजण्यांसाठी आतां आपल्याला धर्माच्या विचाराचं पूर्ण एकत्रित ज्ञान अवगत झालं पाहिजे. सहजयोगीयांनी इतरांनी काय सांगीतलं आहे आणि ते कुठे चुकले, ते वाचून आणि जाणून घेतलं पाहीजे. निरर्थक लोक, जे कांहीच विशेष सांगत नाहीत ते आपण वाचतां कामा नये. "या विचाराच्या वाढीची सूक्ष्मतर बाजू; तो कशाप्रकारे वाढला, कसा सूक्ष्मतर झाला आणि जगांतील अनेक लोकांनी सुषुम्नेच्या या मध्य मार्गाला कशाप्रकारे हातभार लावला. आणि त्यानंतर त्यांना पूर्णपणे योगाबद्दल लिहीलं ते आपण वाचलं पाहिजे.

उदा. रविन्द्रनाथ टागोरांनी प्रथम वियोगाविषयी लिहीलं नंतर ते आणखी सूक्ष्म झाले आणि त्यांनी आत्म्याच्या भेटीविषयी लिहीलं. बुद्धाबरोबर तेच झालं. त्यांनी सर्वसंगपरित्याग केला. त्यांच्या कुटुंबाचादेखील. उपनिषद आणि इतर पवित्र ग्रंथ वाचले. शेवटी ते गयेला पोहोचले. तिथे जेव्हां ते पूर्ण थकले आणि वीट आल्यानंतर त्यांना त्यांचा आत्मसाक्षात्कार मिळाला, पण बुद्धीच्या अनुयायांना वाटतं कीं, सर्वसंगपरित्याग करण्याआधी त्यांनी जे काय केलं, ते महत्त्वाचं आहे. खरं तर ते होणार होतं कारण, ते किती पवित्र साधक होते. पण सहजयोगीयांना तशाप्रकारचं कांहीही करायला नको. त्यांना फक्त त्यांचा आत्मसाक्षात्कार मिळवायचा आहे. कारण पूर्वजन्मी बहुतेकांनी त्यांच्या अडचणींवर मात केली आहे आणि ते सर्व निरर्थक आहे हे त्यांना माहीत आहे. "किंवा, कदाचित या आयुष्यामध्ये सुद्धां ते सगळं निरर्थक आहे हे त्यांना जाणवलं असावं. आणि त्यानंतर ते सहजयोगामध्ये आले असावे. त्यामुळे हे तुमचं फार मोठं नशीब आहे कीं तुम्ही इथे आहांत तुम्हांला तुमचा आत्मसाक्षात्कार मिळाला आहे आणि तुम्ही स्वतःचा आनंद उपभोगित आहांत."


उजव्या बाजूला राजकीय अंगदेखील आहे. "राजकीय क्षेत्रांतसुद्धां वाढ ही सूक्ष्म, जास्त सूक्ष्म होत जाते." उदा. रशियामध्ये जिथे कम्युनिझम इतका सत्तेवर आधारित होता, पैशांवर आधारित नव्हता, तिथे गोर्बाचेव्ह सारखी व्यक्ति जी त्याला संतुलनामध्ये आणील ती मध्यमार्गावर जन्मणार होती. "अजूनपर्यंत त्यांना ते सांभाळता आलं नाही. पण त्याच्या महान विचाराविषयी आणि दोन राजकीयवादांविषयीच्या विचारांमधील दबाव कमी करण्याचा महान कार्याबद्दल जगभर त्यांचं नांव होइल."

आजचा दुसरा प्रश्न म्हणजे मूलगामीपणा. तोसुद्धां उजवीकडून येतो आणि लोकांना हिंसाचार, वेडेपणा, मूर्खपणाच्या सीमेवर नेतो. "पण आतां नवा रोग आला आहे. जे उजवीकडे फार जास्त जातात जेव्हां पूर्ण शुद्ध मन कामांतून जातं आणि तुम्ही सरपटणाऱ्या प्राण्यांप्रमाणे होता," याचे रूग्ण सर्व कांही समजूं शकतात, नीट बोलू शकतात पण

त्यांना हवं तेव्हां त्यांचे हात आणि पाय हलवूं शकत नाहीत. "हा रोग सर्वांना एक प्रकारची सूचनाच आहे त्यामुळे आपल्याला काळजीपूर्वक राहीलं पाहिजे.

सहजयोगीयांना फार जास्त उजवीकडे जाणं त्यांच्यासाठी फार धोकादायक असतं. कांही लोक फार अतिरेकी तऱ्हेने सहजयोगाचं प्रवचन देतात. तशाप्रकारे आपण कधीच बोलता कामा नये. लोकांवर कोणत्याही प्रकारचा दबाव आणता नये किंवा कांही गोष्टी करू नका म्हणून आज्ञा करता नये किंवा संघटना नको "ते इतकं सहज; इतकं सुरेख - नुसतं कार्यान्वित होतं." आपण सहजयोगी असल्याने मुख्य गोष्ट म्हणजे प्रेम, दया, दैवी आशिर्वाद, जे म्हणजे सर्व प्रकारच्या विधायक गोष्टी निर्माण करणारा सुरेख जिवंत प्रवाह आहे. ही समज जर नसेल तर, तुम्हाला लिडरशीपविषयी अडचणी निर्माण होतील.

"हिंसाचारी लोकांमध्ये सहजयोग कार्यान्वित होत नाही." उत्तम गोष्ट म्हणजे स्वतःची पारख करणं आणि जेव्हां आपण कोणासाठी कांही करीत असतो, कांही म्हणत असतो, त्यावेळी आपण स्वतःलाच विचारलं पाहिजे, "हे हितकारक आहे की विघातक? हे आपला प्रसार करण्यासाठी आहे कीं 'तुझ्यापेक्षां जास्त पवित्र तत्त्वावर आधारभूत 'कीं इतरांच्या भल्यासाठी? "एकदां कां तुम्ही तसं पारखूं लागला कीं, तुम्हालाच आश्चर्य वाटेल कीं, तुमची पूर्ण पद्धत बदलेल; तुमची बोलण्याची पद्धत, कार्यान्वित करण्याची पद्धत - सर्व कांही क्रिडा म्हणून तुम्ही पाहिलं पाहिजे. जर तुम्ही सर्व कांही 'साक्षी' च्या स्थितीमध्ये पाहिलं तर, तुम्ही सर्व परिस्थिती व्यवस्थित हाताळू शकाल. जरी तुम्ही कांही बोललात नाही, एकही अक्षर काढलं नाही तरीही 'साक्षी' च्या स्थितीमध्ये तुम्ही अत्यंत शक्तिमान व्हाल. मी असं म्हणते आहे कीं साक्षीच्या स्थितीमध्ये तुम्ही अनेक प्रश्न सहजगत्या सोडवू शकता. ईश्वर तुम्हाला आशिर्वाद देवो."



# गुरूपूजा

## कबेला इटली १९/७/९२

गुरुचे स्थान ही स्थिती आहे, समाजातील स्थान नव्हे. कारण सामाजिक स्थान हे बाह्यामध्ये असते. आणि कोणालाही ते बहाल करता येते. बाह्यामधील त्याच्या लायकीप्रमाणे त्या व्यक्तिला सामाजिक दर्जा तुम्ही देऊ शकता. ती स्थिती आहे, याचा अर्थ अंतर्यामी उत्क्रांत होऊन तुम्ही त्या स्थितीला पोहोचता जिथे तुम्ही स्वामी होता. सुरुवातीला तुम्हाला स्वतःचे स्वामी बनावं लागतं. नाहीतर तुम्ही त्या स्थितीप्रत कसे जाल? जर ती सहज असेल, नैसर्गिक असेल जर आपण ती कशी काय साध्य करतो?

सुरुवातील कांही विशेष सामर्थ्य-कार्यक्षमता आपण विकसित केली पाहिजे. त्यामध्ये पहिली क्षमता म्हणजे निर्विचार होणे. ध्यानामध्ये थोडावेळ तुम्ही निर्विचार होऊ शकता. हळूहळू, क्रमाक्रमाने हा थोडा वेळ वाढत गेला पाहिजे. ही स्थिती आहे. तर, कशाप्रकारे आपण ती साध्य करूं शकतो? मानवांला समजत नाही ते हे कीं, कांहीही सहजगत्या होऊं शकतं, कारण ते सहज असतं. ते फार साधं असतं. तुमच्याकडे मंत्र आहे ज्याचं नांव 'निर्विचार'. नंतर तुम्ही विचार न करतां साक्षी होऊन बघायला सुरुवात करतां. नुसतं पहाता - साक्षीस्वरुप. नुसतं पहाण्यामुळे आपल्यामध्ये पहिली स्थिती निर्माण होते. तुम्ही 'साक्षी' होता. तुम्ही 'साक्षी' बनलात कीं ताबडतोब ती पूर्ण गोष्ट, जी तुम्ही पहात आहांत, तुम्हाला पूर्ण कल्पना देते. सूक्ष्मांतली आणि स्थूलांतलीदेखील. तुम्ही बघता, आणि तुम्हाला समजतं. सहजयोगी म्हणून ते तुमचं ज्ञान होतं. आधुनिक परिभाषेमध्ये आपण म्हणूं शकतो कीं तुम्ही एखादी गोष्ट बघता, ती तुमच्या मनामध्ये चित्रीत होते. आणि आनंद, ज्ञान, करूणा, जी परिस्थिती असेल त्याप्रमाणे, ते भाव प्रकट करते. कारण आतां तुम्हाला अनेक मोजमापं आहेत, जी तुम्हाला विकसित करायची आहेत. उदाहरणार्थ, तुम्ही एकाद्या व्यक्तिला भेटला, ज्याच्याशी तुम्हाला व्यवहार करायचा आहे, तो नुसता बोलत सुटला आहे, नुसतं निर्विचार व्हा. तुम्ही निर्विचार झाला रे झाला कीं, त्याचे विचार आणि त्याची बडबड तुम्हाला शिवणार नाही. कारण तुम्ही एका पूर्णपणे वेगळ्याच प्रांतात असता. पण त्या प्रांतांत तुमची शक्ति प्रकट होइल आणि ती त्याला थंड करेल; ती त्याला गप्प करेल किंवा त्याला तुमच्याविषयी अतोनात प्रेम वाटूं लागेल.

गुरु हा शब्द म्हणजे गुरुत्वाकर्षण ग्रॅव्हिटी. पृथ्वीला गुरुत्त्वाकर्षण असतं. जी व्यक्ति गुरु असते तिला गुरुत्वाकर्षण असावं लागतं. हे गुरुत्त्वाकर्षण तुम्ही कसं काय विकसित करतां? कांही लोक कृत्रिमरित्या फार गंभीर होतात. आणि कधी कधी ते फार विवेकी आहेत असं दाखवितात. गुरुत्वाकर्षण हे तुमच्यामध्ये असतं. गुरूपदाच्या तुमच्या दुसऱ्या स्थितीमध्ये गुरुत्वाकर्षण प्रकटीत झालं पाहिजे. जसजसे तुम्ही साक्षी होता, तेव्हां तुमचं गुरुत्वाकर्षण व्यक्त होऊ लागतं. मनस्वीपणा किंवा गांभीर्य म्हणून नव्हे तर ते अशा तऱ्हेने अविष्कार पावतं कीं ती पूर्ण गोष्टच भव्य आणि गौरवशाली होइल. ज्या स्थितीमध्ये आतां तुम्ही वर उठत आहांत, ती परिणामकारक होइल. त्याआधी हे असं नव्हतं. सतत तुम्हाला असं तसं बोलावं लागत होतं. कौशल्याने हाताळावं लागत होतं. पण शांततेमध्ये तुमच्या गुरुत्वाकर्षणाचं प्रकटीकरण तुम्ही करूं शकता. हे गुरुत्वाकर्षण लोहचुंबकासारखं कार्य करतं. पृथ्वीमातेमध्ये लोहचुंबक आहे, ज्याला गुरुत्त्वाकर्षण म्हणतात; ज्यामुळे लोक आकर्षित होतात. आणि या पृथ्वीमातेवर तिच्या गुरुत्त्वाकर्षणामुळेच आपण विश्राम करतो. तुमचा स्वभाव, चारित्र्य, व्यक्तिमत्त्व आकर्षक होतं. हे आकर्षक व्यक्तिमत्त्व ताबडतोब त्याची शक्ति प्रकट करूं लागतं. ज्याप्रमाणे सूर्यकिरण पानांवर पडतात, साधे भासणारे हे सूर्यकिरण त्यांची क्लोरोफिल तयार करण्याची शक्ति प्रकट करतात. अगदी त्याचप्रकारे जेव्हां तुम्ही त्या स्थितीला अथवा त्या उंचीवर असतां त्यावेळी नुसत्या कटाक्षाने तुम्ही त्याचं प्रकटीकरण करूं शकता. नुसतं तेव्हढचं नव्हे तर, सर्व कांही तुम्ही रेकॉर्ड करता. चित्रीत करता. फार क्वचित मी एखादी गोष्ट विसरते.

विचार न करतां एखादी गोष्ट तुम्ही साक्षीस्वरूपांत पाहूं लागतां तेव्हां, त्यावेळी त्या गोष्टीविषयक माहिती शोषून घेण्यामध्ये कांहीच अडथळा नसतो. तिथे विचार नसतो. पूर्ण शोषण होतं. त्यानंतर त्याचं प्रकटीकरण होतं. अशा प्रकारे दैवी शक्ति आपल्यामध्ये कार्य करते. आपल्या गुरुत्त्वाकर्षणामुळे आपण आपल्यामधील त्या गहनतेला स्पर्श करतो, जी आपल्यामध्ये दैवी शक्ति वाहून नेऊ शकते आणि तिचं प्रकटीकरणही होतं. जोपर्यंत आपण आपल्यामध्ये त्या गहनतेला स्पर्श करीत नाही, तोपर्यंत सहजयोग हा 'हरे कृष्ण हरे राम' सारखाच आहे. त्यामुळेच अनेक सहजयोगी आपल्याला अचानक रूळांवरून घसरलेले दिसतात कारण, त्यांच्यामध्ये त्यांच्या स्वतःच्या व्यक्तिमत्त्वांत जाण्याची गुरुत्त्वाकर्षणाची शक्ति नसेल, तसेच, ती दैवी शक्ति प्रकट करण्यासांठी ते गुरुत्वाकर्षण वापरण्याचीसुद्धां शक्ति नसते. उदाहरणार्थ वाहन योग्य तऱ्हेने तयार केलं नसेल तर, कांही भरीव कार्यासांठी ते वापरतां येत नाही. तुमच्या आयुष्यांतील भरदार गोष्ट म्हणजे ही दैवी शक्ति आहे, जी जास्त किंमती वाटत नाही. या दैवी शक्तिचं वजन किंवा भार वाटत नाही. पण तुमची वाहिनी जर स्वच्छ नसेल तर ही दैवी शक्ति नीट वाहूं शकत नाही आणि प्रकट होऊ शकत नाही. त्यामुळे आपण तेव्हां म्हणतो आपण सर्वशक्तिमान परमेश्वराचे साधन आहोत; मुख्य यंत्रणेशी संधान साधून आहोत, जर हे साधन ठीक नसेल तर त्याने जे कांही केले पाहिजे

त्याचे प्रकटीकरण होऊ शकत नाही. आपण तर सर्वसामान्य साधनांच्या फार वर आहोत. गुंतागुंतीच्या व प्रगत अशा सायन्सने केलेल्या साधनांपेक्षाही वर कारण, आपण त्या स्थितीला पोहोचला आहोत जिथे आपण स्वतःच सायन्स झालो आहोत. सत्याचं शास्त्र. पूर्ण सत्य.

तेव्हां गुरुकडे हवं ते स्वतःविषयीचं चांगलं मत! हा फार महत्त्वाचा मुद्दा आहे. स्वतःची किंमत करायला आपल्याला आत्मपरिक्षण केलं पाहिजे. आणि समजून घेतलं पाहिजे कीं या आधी मी जे कांही होतो, ते आज नाही. मी आत्मसाक्षात्कारी व्यक्ति आहे. माझ्याकडे शक्त्या आहेत. प्रेम, करूणा, गोष्टींचं आकलन करण्याची शक्ति, निर्मितीची शक्ति, इतरांना आत्मसाक्षात्कार देण्याची शक्ति माझ्याकडे आहे. कोणाकडेही या शक्त्या नाहीत. सहजयोगांत आपण सेल्फकॉशन्स, (स्वतःची जाणीव असणारे) नसतो. आपण तसे असतां नसे कारण, त्यामुळे तुम्हाला अहंकार होऊ शकतो. पण आपल्याकडे स्वतःबाबत चांगलं मत हवं. "मी गुरु आहे. रस्त्यावरची साधी सर्वसामान्य शक्ति नव्हे. मी कांहीतरी विशेष आहे. मी सत्याच्या किनाऱ्यावर आहे. आंधळ्या आणि मूर्ख लोकांना मला वांचवायचं आहे."

त्यावेळी तुमच्यामध्ये एक प्रकारची शांतता येईल. जेव्हां असं कांही संकट, आणिबाणीची वेळ ओढावेल, तेव्हां तुम्ही अतिशय शांत व्हाल, परत ही देखिल स्थिती आहे. अवस्था आहे. जर तुम्हाला खिन्न किंवा अस्वस्थ करणारी एखादी गोष्ट झाली तर, चाकाचा तो आंस पकडण्याचा प्रयत्न करा, जो म्हणजे फक्त शांतता आहे, ही शांतता तुम्हाला खरोखर शक्तिशाली करेल; ही शांतता तुमची नाही कारण, जेव्हां तुम्ही त्या शांततेमध्ये असतां त्यावेळी तुम्ही विश्वाच्या शांततेमध्ये असतां त्या दैवीशक्तिशी तुमची सांगड साधलेली असते; जी शक्ति साऱ्या विश्वाची कार्यकर्ती आहे. जर तुम्ही नुसते शांत झालांत तर समजा कीं, तुम्ही देवाच्या साम्राज्यांत बसले आहांत. जेव्हां तुम्हांला राजा बनण्याचा मोठा सन्मान मिळतो तेव्हा तुमच्या सिंहासनापर्यंत तुम्ही चालत जातां आणि बसतां, आजूबाजूला बघता, आणि या स्थितीची शांतता तुम्हाला जाणवते कीं, आतां तुम्ही राजे आहांत. ही शांतता ही खूण आहे कीं, तुम्ही नक्की दैवी शक्तिबरोबर जोडले गेले आहांत. तुम्ही शांत आहांत कारण आतां दैवीशक्ति सगळीकडे लक्ष पुरविणार आहे. तुम्हाला कांहीच करायचं नाही. नुसतं शांत रहा. दबावामुळे नाही. परत ही पण एक स्थिती आहे. जर एखादा प्रश्न उद्‌भवला, संकट कोसळलं, तर तुमचं चित्त चटकन त्या शांततेकडे उडी घेइल आणि एकदां कां तसं झालं कीं, या सर्वव्यापी शक्तिशी तुम्ही जोडले असाल.

ही सर्वव्यापी प्रेमशक्ति काय आहे. आसमंतात उडत असणारी एखादी शक्ति काय आहे? कां ती एकाद्या प्रकारची नदी किंवा अवकाश कधीही आहे? ते वास्तवतेची अखंड संपूर्णता, समग्र संपूर्णता आहे. इतर गोष्टी खऱ्या नाहीत. वास्तवता ही इतकी कार्यक्षम आहे की ती दगा देत नाही. या आपल्या मानवी आकलनशक्तिने ती कशाप्रकारे सर्वांवर ताबा ठेवते किंवा काम करते त्याची आपण कल्पनादेखील करूं शकत नाही. उदा. तुम्ही झाडं बघा. गुलाबाचं रोपटं फक्त गुलाबच देईल. ते सफरचंद देणार नाही. ते एका विविक्षीत उंचीपर्यंतच वाढेल. नारळाच्या झाडासारखं वाढणार नाही. या प्रकारचे सर्व स्वभावधर्म राखून ठेवले आहेत. त्यांचं पोषण केलं गेलं आहे, काळजी घेतली गेली आहे. पूर्णपणे ताब्यांत ठेवले गेले आहेत आणि तेहां योग्य वेळी, योग्य सीझनला. त्यामुळेच तिला ऋतंभरा प्रज्ञा म्हणतात. मानवी मेंदूसाठी ते फार किचकट आहे आणि ते कसं कार्यान्वित होतं, ते ते समजूं शकत नाही. सर्व चमत्कार या शक्तिच्या साध्या क्रिडा आहेत, जी विचार करते. समजून घेते, व्यवस्थित मांडणी करते, सहकार्य देते, प्रेम करते तुमच्याकडे लक्ष पुरवते. ती तुमच्या विनीयोगासांठी आहे. तुम्ही जिथे जाल, तिथे तुमचं संधान अबाधित राखलेलं असतं जसा गव्हर्नर प्रवास करतो तेव्हां नोंद करून ठेवलेली आहे. आणि त्यांना माहीत आहे की, त्यांना ज्यांची काळजी घ्यायची आहे ते तुम्ही आहांत. तुम्ही सहजयोगी आहांत. त्यामुळे तुम्ही इतके विशेष लोक आहांत कीं, तुम्ही कुठेही असाल, झोपलेले, चालत, बसलेले, ती सांगड जोडलेली असते. तुम्हांला कांही म्हणावं लागत नाही; आज्ञा द्यावी लागत नाही किंवा विनंती करावी लागत नाही. ती तुमच्या विनीयोगासांठी आहे, कारण तुम्ही देवाच्या साम्राज्यांतले एक गव्हर्नर आहांत. जो कोणी तुम्हाला त्रास देऊ पाहील, तुमचा अपमान करूं पाहील, त्याला त्याची किंमत मोजावी लागेल. त्या भौतिक पातळीवरच्या गोष्टींबद्दल तुम्ही कधीच विचार किंवा काळजी करतां नये. त्या उलट मी म्हणेन, त्यांना क्षमा करणं बरं कारण त्या गैरवर्तन करणाऱ्या काय होइल. ते फक्त देवालाच ठाऊक. तुम्ही विशेष लोक आहांत फक्त तुम्ही तुमचं स्वतःविषयीचं चांगलं मत राखा. आणि स्वतःला संतुलनांत ठेवण्याचा प्रयत्न करा.

एकदां कां तुम्ही संतुलनामध्ये आलांत कीं, इतरांचं संतुलन ठेवणं हे गुरुचं काम आहे. ते सगळ्याचं संतुलन करतं. वातावरण, हवामान, निसर्ग, समाज, मानव साऱ्यांचं. तुम्हाला संतुलित करण्यासांठी ते तिथे आहे. ते संतुलन गुरुतत्त्वामधून येतं. जे तुम्हांला संतुलित करतं. तुमच्यामध्ये गुरुतत्त्व असेल तर आपोआप तुम्ही संतुलनामध्ये येता. आपलं संतुलन आपण कसं तयार करतो? पुरातन कालामध्ये उपास, संन्यस्त रहाणे, आसनं वगैरे फार कठोर पद्धती होत्या. त्यामुळे खूप असंतुलन होत असे. जर तुम्ही खूप खडतर, उग्र तपश्चर्येचं जीवन जगलात तर तुम्ही शुष्क व्यक्ति व्हाल, आणि जळल्यासारखं गरम वाटेल. या सर्वसंगपरित्याग करण्याच्या कल्पना आल्या असाव्यात कारण, कदाचित, लोकांनी आपल्या आत्म्याकडे जास्त लक्ष द्यावं असं त्यांना वाटत असेल. गुरु हा नैसर्गिकरित्या सर्वसंगपरित्याग करणारा नसतो. तो इतका अलिप्त असतो कीं, सर्वसंग परित्याग केल्याप्रमाणेच असतो. तो राजा असो नाहीतर भिकारी. तो गुरु असेल तर प्रत्येक अवस्थेमध्ये पूर्ण संतुलनांत असतो. कांहीही त्याला विचलित करूं शकत नाही. गुरु भरपूर खाईल किंवा कांहीच खाणार नाही. कांहीही त्याच्यावर दबाव आणूं शकत नाही. अन्न, सत्ता, श्रीमंती, पैसा किंवा आणखी कशानेही

तुमच्यावर दबाव येता नये. तुम्ही सर्वांच्यावर आहांत. तुम्हांला एकदां कळलं की तुम्ही सर्वांपलीकडे आहांत कीं मग तुम्हाला भिती वाटत नाही. तुमच्यामध्ये निर्भयता येते. कांहीही तुम्हाला मोहांत पाडू शकत नाही. मोह नसतो. मोह, अधाशीपणा किंवा हांव याच्या पलिकडच्या स्थितीत तुम्ही जेव्हा पोहोचता तेव्हां, तिथे प्रश्नच नसतो. कांहीही तुम्हाला खाली आणू शकत नाही. तुम्ही तुळशीची माळ घाला, मोती घाला, हिरे घाला त्याचा तुम्हाला स्पर्श होत नाही. पण तुम्ही कशापासूनही पळून जाऊ शकत नाही. तुम्ही जेव्हां कशापासून पळून जातां तेव्हा तुम्ही कृत्रिमरित्या सर्वसंगपरित्याग करणारे होता. सर्वसंगपरित्याग तुमच्यामध्ये आहे. तो नैसर्गिक आहे.

बहुतेक वेळां लोकांच्या बाबतीत असं होतं कीं, त्यांना वाटतं, ते गुरु नाहीत. ते येऊन मला सांगतात, "जी कांही लक्षणं तुम्ही मला सांगितलीत ती अजूनही आहेत. अजूनही मला इच्छा आहेत." तुम्ही उलट्या बाजूने जात आहांत. मी तुम्हांला जे कांही सांगते, त्याचं मूल्यमापन किंवा पारख तुम्ही करतां नये. पारख करूं नका. नुसतं हळूहळू वर उठा, आणि तुमची स्वतःची योग्यता ओळखा आणि सावकाश तुम्ही मिळवलेल्या स्थानावर प्रस्थापित व्हा. पण जर तुम्ही त्याची पारख करू लागला तर, तुम्हाला आत्मविश्वास नसल्यासारखं वाटेल. उदास वाटेल. "माताजींनी सांगीतलं आहे, आम्हांला हे पाहिजे." सतत स्वतःची पारख करणं तुम्हाला सहाय्य करणार नाही. तुम्ही स्वतःविषयी खात्री असलेले आहांत. स्वतःविषयी तुम्हाला आत्मविश्वास आहे.

कांही लोक म्हणतात, "श्रीमाताजींनी असं सांगीतलं," मी सांगितलं असेल, कदाचित नसेलही. ठीक, तर, मी म्हटलं होतं तसं. मग, तुम्ही काय म्हणतां? दुसऱ्याला त्रास देण्याचा हा चांगला मार्ग आहे. काय चांगलं आहे हे तुमच्या स्वतःच्या अनुभवामधून तुम्हाला कळलं पाहिजे. तुम्ही आधीपासूनच मानव आहांत आणि मानवजातीला तुम्ही जाणता. त्यामुळें तुम्हाला जास्तच आनंद अनुभवता येतो. मग तुमची वाढ तुम्ही पाहता, आणि त्याचं महत्त्व ओळखता. मला ते वेगळंच आहे कारण, मोह आणि हे तुम्हाला असणारे इतर सारे गुण मला माहीत नाहीत. मानवापासून वरच्या पातळीला तुम्ही आला आहांत, हे फार प्रशंसनीय आहे. ख्रिस्ताने किंवा कृष्णाने अनुभवला, किंवा मी अनुभवला, त्यापेक्षां जास्त आनंद तुम्ही अनुभवूं शकतां. कारण जो कोणी वर उठला, वाढला आहे त्याला त्याच्या सद्गुणांचा, गुणवत्तेचा, महानतेचा सुगंध येतो. त्यानंतर तो स्वतःचा आनंद अनुभवतो. त्याला या बदलाचं नीट आकलन होतं. इतर माणसे, ज्यांना तुमची क्षमता, तुमचं ज्ञान, तुमची गहनता, तुमचं गांभीर्य नाही, त्यांना तुम्ही समजूं शकता. आतां तुम्ही दैवी झाला आहांत. पण तुम्ही मानव होता, म्हणून इतर लोकांना तुम्ही समजूं शकता. खरे गुरु फार कठोर लोक होते. पण मी आई आहे. ते गुरु मानवी पातळीमधून आले होते. त्या गुरुंपेक्षां तुम्ही वेगळे आहांत. तुम्हाला ते सहज मिळालं आहे तर, त्यांना फार झगडावं लागलं. सर्व गोष्टीं बाबतचा तुमचा दृष्टीकोन जास्त करूणामय असला पाहिजे. जास्त जाणता, जास्त प्रेममय असला पाहिजे. तुम्हाला जसं ते सहज मिळालं, तसं इतरांनाही ते तुमच्याकडून मिळूं शकतं. तुम्ही त्यांच्यावर ओरडतां नये. कोणालाही कठोर शब्द बोलण्याचा सहजयोग्यांना अधिकार नाही. तुम्हांला कांही न बोलतां, तुम्हाला तुमचा आत्मसाक्षात्कार मिळाला. तुमच्याकडे कोणी आत्मसाक्षात्कार घ्यायला आलं तर, तुम्हीसुद्धां त्याचप्रकारे तो दिला पाहिजे. तुम्ही जर असा कठोर दृष्टीकोन बाळगला तर तुम्ही गुरु होऊ शकता पण सहजगुरु नाही.

सहजगुरु आणि असहजगुरु यांमध्ये फरक आहे. असहज गुरु फार गरम स्वभावाचे असतात. सहजगुरुला गरम होण्याचं कारणच नसतं. इथे इतकं प्रेम आणि करूणा असते, एकमेकांविषयी इतकं प्रेम, चढाओढ नाही, राजकारण नाही. तुम्हाला सगळंकांही सहजगत्या मिळालं, हे जाणून त्याच सहजतेने इतरांना ते द्या. त्यांचा मान राखा. तुम्ही सगळे गुरु आहांत, हे तुम्ही जाणतां. तुमच्याकडे सर्व शक्त्या आहेत. तुम्ही इतकं मिळवलं आहे, इतकं मिळवूं शकता, पण तुम्हाला सहज असलं पाहिजे. तुम्हाला सहज मिळालं तर तुम्ही कठोर, भयानक, रागवलेले कडक गुरु बनता नये. पण ते हळूहळू अंगावर येतं. सहजयोगांत सैनिकी शिस्त चालू होते. शिस्तीची गरज नाही. ते स्वतःहून स्वतःला शिस्त लावून घेतील. ते सुद्धां गुरु आहेत. गुरुला कोण शिस्त लावणार? आणि ते सहज आहेत. या सर्व असहगुरुंना आत्मसाक्षात्कार कसा द्यायचा ते माहीत नाही. कुंडालिनी त्यांच्या हातांमुळे वर चढू शकते हे त्यांना कधीच माहीत नव्हतं. अजूनपर्यंत इतिहासांत फार थोड्या लोकांनी आत्मसाक्षात्कार दिला आहे. पण तुम्ही लोक डावीउजवीकडून कोणालाही देत आहांत. आतां तुम्ही सायन्सच्या मर्यादा ओलांडल्या आहेत. तुम्ही स्वतःच देवाचं शास्त्र बनला आहांत. तुमची आणि इतरांची चक्रं पकडणं याविषयी सर्व कांही तुम्ही जाणता. पण इतरांशी व्यवहार करतांना आपण गुरुपदाच्या मार्गाने गेलं पाहिजे. म्हणजेच दयाळूपणा, माधुर्य आणि कळकळ. तुमच्या आईने तुम्हाला दिलं आहे ते हेच. प्रत्येक व्यक्तिविषयी तुम्हाला आस्था बाळगली पाहिजे. तुम्हाला गुरुमाउली झालं पाहिजे. अत्यंत प्रेमळ, दयाळू, सर्व समजून घेणारं आणि क्षमा करणारं.

सहजयोग पसरविणं, त्याद्वारे पूर्ण जगाला बंधनमुक्त करणं, ही आपली जबाबदारी आहे. तेव्हां आतां पुजारीपण नाही, "हा माणूस असं म्हणतो" नाही. तुम्हाला जे कांही सांगायचं असतं, ते त्या व्यक्तिला सांगा. तुमचं व्यक्तिमत्त्व दुसऱ्या व्यक्तिवर तुम्ही कशाप्रकारे प्रतिबिंबित करीत आहांत ते तुमचं तुम्हीच बघाल. त्याची प्रतिक्रिया काय, तो कसा काय वागतो. मी बघते आहे, क्रमाक्रमाने आपली सामुहिकता हे सगळं शिकते आहे. आणि ते भयानक दबाव टाकणारे लोक सहजयोगामधून पळून गेले आहेत. लोक एकमेकांशी व इतरांशी फार प्रेमळपणे आस्थेने वागतांना मला आढळतात. कारण तुम्ही मुर्तिमंत चांगुलपणा, नितीमत्ता, सोशिकता, करूणा, प्रेम व आस्था आहांत. तुम्ही ते कसं करणार असं नाही. ते तुम्ही सोडतां नये. स्वतःबद्दल चांगलं मत पाहिजे आणि त्याचा अंगिकार केला पाहिजे. तुम्ही गुरु आहांत तर स्वतःच्या शक्त्यांचा स्विकार करा. अजूनही तुम्ही विचार करता, 'देव जाणे, मला शक्त्या

आहेत की नाहीत' असा. मग तुम्ही अजून नवेकोरेच आहांत. आपण नुसतं आपल्या ओठांनी म्हणतो, "माताजी, मी माझा स्वतःचा गुरु आहे." हे आपल्याकडे असलेल सामुहिक गुरुपद आहे. आतां आपल्याकडून कांहीही सुटू शकणार नाही. आपण पूर्णपणे जबरदस्त आहोत. आपण एखाद्याला निवडतो, त्याच्या अंगावर पोशाख चढवितो आणि म्हणतो, तो 'पोप' (धर्मगुरु) आहे. तो नसतो, तो नुसती भुमिका करीत असतो. पण अंतर्यामी तो नसतो. नुसतं नाटक करीत असतो. तो चुकीला पात्र असतो. तुम्ही अंगीकार करूं लागा. साऱ्या बाधा पळून जातील आणि तुम्हाला आश्चर्य वाटेल. कोण आहे, जो त्या व्यक्तिपुढे उभा राहू शकतो जी व्यक्ति साधू आहे, गुरु आहे आणि तो गुरु आहे हे ज्याला माहीत आहे.


तुमचं स्वतःविषयीचं मत पूर्णपणे बरोबर आहे, हे पहाण्यासांठी तुम्हाला आत्मपरिक्षण केलं पाहिजे. इतर खऱ्या गुरुंमध्ये सहजधर्तीच्या करूणेचा अभाव असतो. कारण त्यांना वाटतं त्यांनी खडतर कष्ट काढले आहेत; तर या लोकांनी कां श्रम करूं नये? तुम्ही कोणीही असा, शिक्षीत, अशिक्षीत, हे किंवा हे काम करणारे, गरीब किंवा श्रीमंत कांही फरक पडत नाही. तुम्ही गुरु आहांत तुमच्या शक्त्या धारण करा. कोणत्याही विशेष कौशल्याची गोष्ट उदा. संगीत. संगीत जाणता हे तुम्हाला माहीत आहे. तुम्हाला स्वयंपाक येतो वगैरे. पण ते सुद्धा पूर्णपणे पूर्णत्त्व नसेल. तुम्ही आधीच वास्तवतेचं अखंड पूर्णत्त्व आहांत. वास्तवता तुमच्या विनियोगासांठीच आहे पण तीचा अंगीकार करा. तुम्ही सर्वसामान्य मुळीच नाही. त्यामध्येच जे निरर्थक आहे, त्याचा तुम्ही त्याग कराल इतर लोक तुम्हाला पाहून आश्चर्य करतील. हे ज्ञान इतकं सूक्ष्मामधलं, उच्च कोटीतलं, महान आहे. अहंकाराने फुगून गेल्यासारखं तुम्हाला कधीच वाटणार नाही. या सर्व ज्ञानामुळे तुम्ही खाली झुकता, फळांनी लादलेलं झाड झुकतं ना तसंच. ती विनयशीलता आणि साधेपणा तुम्हाला एक विशेष धारदारपणा देतो, जो कोणत्याही हृदयाचा छेद घेऊ शकतो. अशाप्रकारे तुम्ही सत्याचे प्रेषित बनता. विल्यम ब्लेकसारखे भविष्यकथन करणारे महापुरुष तुम्ही बनूं शकता. सर्व शक्तिमान ईश्वराच्या त्या महान शक्तिची तुम्ही एकात्म पावला आहांत यावर विश्वास ठेवा.

ख्रिस्ताच्या निष्कलंक गर्भधारणेबद्दल लोक चर्चा करतात. पण तो सर्वशक्तिमान परमेश्वर आहे. तो कांहीही करूं शकतो. त्याची आणि त्याच्या शक्त्यांची पारख तुम्ही कसे करणार? देवाविषयी चर्चा करण्यासांठी तुमच्याकडे त्याचा मेंदू आहे कां? तो सर्वशक्तिमान परमेश्वर आहे याचं आकलन तुम्हाला विनम्रतेत होतं. तो कांहीही करू शकतो. आणि शिवाय तिथे श्रद्धा आहे. अंधश्रद्धा नव्हे तर, खरी श्रद्धा, त्या जाणीवेतली की सर्वशक्तिमान असा तो परमेश्वरच आहे आणि तुम्ही त्याचे संदेशवाहक आहांत. ती जाणीव तुम्हाला सर्व ताकद, धैर्य, त्याची करूणा, प्रेम, चित्त आणि आकलन देतं. ही श्रद्धा त्याच्याशी तादात्म्य पावलेली असते. एकदां मी एका खऱ्या गुरुला भेटायला गेले. तो फार कठोर होता. तो देवीशी जसं बोलेल, अगदी तसंच माझ्याशी बोलत होता. त्यांनी म्हटलं, "ही या जगांतली लोकं तुम्हांला कशी वाटतात?" मी म्हटलं "ठीक आहेत. शेवटी मीच त्यांना निर्माण केलं आहे. ते म्हणाले, "तुम्ही देव आहांत. तुमच्या शक्तीने त्यांना थोडसं बदलत कां नाही?" मी म्हटलं, "मी त्यांना स्वातंत्र्य दिलं आहे. त्यामुळे बदलायचं की नाही ही निवड त्यांची आहे. मी त्यांच्यावर दबाव आणूं शकत नाही. मला काय करायचं असेल ते मी करूं शकते पण कांही गोष्टी मला करायच्या नाहीत. हवी ती निवड करण्याचं त्यांना स्वातंत्र्य आहे. त्यांचं हे स्वातंत्र्य अबाधित राहिलं पाहिजे. तुम्ही गुरु आहांत. समजा मी जर सर्वशक्तिमान परमेश्वर आहे तर, मी तुमच्यासारखं असूं शकत नाही त्यानंतर त्यांच्या सर्व शिष्यवृंदाला त्यांनी 'तिची स्तुति करा असं सांगितलं." कारण देवाला स्तुति आवडते. ते म्हणाले, "तुम्ही जर देवाची स्तुति केलीत तर तो तुम्हाला हवं ते देईल." मी म्हटलं, "ते खरंय. हृदयापासून भक्ति असल्याशिवाय तुम्हाला आई मिळणार नाही. भक्तिशिवाय तुम्हाला देव मिळत नाही. जर कोणी त्याची कुंडलिनीचं उत्थान करण्याची मागणी केली तर मी ते करणार नाही. पण कोणी विनम्रपणे भक्तिने विचारलं. आत्मसाक्षात्कार मागीतला, तो मिळतो. नुसती भक्ति नव्हे पण श्रद्धा पाहिजे. आतां सायन्सने, कॅथॉलिक चर्चने, आणि इतर भयानक लोकांनी या श्रद्धेला आव्हान दिले आहे. देवावरची तुमची श्रद्धा पूर्णपणे निष्कलंक हवी. तिला कोणीही विचलित करूं शकत नाही. देवाचे चमत्कार तुम्ही पाहिले आहेत. त्याच्या शक्त्या तुम्ही कशा कार्यरत करीत आहांत ते तुम्ही पाहीलं आहे. या सर्व गोष्टी तुम्हाला ठाऊक आहेत. पण तरीही देवावरची श्रद्धा हरपली आहे. राहून गेली आहे. देवावर पूर्ण श्रद्धा असणारी व्यक्ति स्वतःच देव असते. जो स्वतःच ब्रह्मचैतन्य आहे त्याला गुरु म्हणतात. देव आहे आणि मी त्या देवाचा प्रेषित आहे. ही देवावरची श्रद्धा जेव्हा पूर्णपणे प्रस्थापित होते, आणि तुमच्यामध्ये पूर्णपणे ठासून बसते. त्यावेळी तुम्ही गुरुपदात असता.

आज मी तुम्हाला आशिर्वाद देते कीं, त्या गुरुपदाच्या स्थितीमध्ये तुम्ही वास्तव्य कराल. अशी अवस्था तुम्ही सर्व मिळवाल. तुम्ही कोठेही असाल, तुमची स्थिती कशीही असेल, तुम्ही कांहीही करत असाल तरीही, तुमच्या अंतर्यामी खरोखर असणारी सर्वशक्तिमान परमेश्वराची श्रद्धा स्वतःला व्यक्त करेल, अविष्कृत करेल. ती देवासारखीच कार्य करेल.

आज आपण एक गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे कीं, देवाच्या साम्राज्यावर आपली पूर्ण श्रद्धा पाहिजे. सर्वशक्तिमान परमेश्वराच्या शक्त्यांवर. तसेच त्यानंतर आपल्यावर पूर्ण श्रद्धा हवी.

देव तुम्हाला आशिर्वाद देवो.



# २६ व २७ फेब्रुवारी १९८७ रोजी मुंबईमध्ये झालेल्या शिवपूजेच्या वेळी श्री माताजींनी सांगीतलेल्या कांही गोष्टी.

सहजयोग हा मला पहिल्यापासूनच माहित होता. ते एक अद्वितीय असं ज्ञान आहे जे माझ्याकडे जन्मतःच होतं. ते उघडकीला आणणं इतकं सोपं नव्हतं. आणि कशाप्रकारे ते लोकांना दाखवायचं, ते मला शोधून काढायचं होतं.

सातवं चक्र प्रथम उघडलं पाहिजे असा मी विचार केला. जे मी 'पांच मे' च्या दिवशी उघडलं. एक प्रकारे हे गुपित आहे. याआधी ब्रम्हचैतन्य अव्यक्त होतं. त्याचं प्रकटीकरण झालं नव्हतं. ब्रम्हचैतन्य म्हणून ते व्यक्त झालं नव्हतं. त्यामुळेच आत्मसाक्षात्कार घेऊन ज्या लोकांना ब्रम्हचैतन्याप्रत पोहोचणं शक्य झालं, ते म्हणाले, "तो निराकाराचा गुण होता. तुम्ही सागरामध्ये विरघळून जाणाऱ्या थेंबाप्रमाणे असतां." कोणीही लोकांना त्याविषयी जास्त सांगू शकत नव्हतं, स्पष्टीकरण येऊ शकत नव्हतं. या ब्रम्हचैतन्याच्या महान सागरामधून आलेल्या या महान अवतरणांनीदेखिल. त्यांच्या उत्कृष्ट अनुयायांना (जे फारच थोडे होते) त्यांना हे ज्ञान वांटण्याचा, त्यांची या ब्रम्हचैतन्याशी ओळख करून देण्याचा प्रयत्न केला पण ब्रम्हचैतन्य व्यक्त रूपामध्ये नसल्याने अवतरणं त्यामध्ये विरघळून गेली - ज्याप्रमाणे ज्ञानेश्वरांनी समाधी घेतली त्याप्रमाणे. लोक म्हणाले, त्यांना बोलता येत नाही. त्याचा अनुभव घेतला पाहिजे. त्यामुळे फार थोड्या लोकांना ते पचविता आलं. हा अनुभव त्यांच्या बोटांवर संवेदना देऊन किंवा त्यांच्या ज्ञानेंद्रियांवर त्याची जाणीव देऊन किंवा त्यांच्या मनाला जाणीव देऊन वास्तवतेमध्ये आणणं किंवा त्यांच्या बुद्धीने ते जाणूं शकतील अशाप्रकारे समजावून देणं हे कोणीही करूं शकलं नाही. तर, ती फार मोठी अडचण होती. त्या सर्वांनी प्रयत्न केले आणि त्यासांठी पार्श्वभूमि तयार केली.

आतां या ब्रम्हचैतन्याचं पूर्ण अवतरण म्हणून मी आले आहे. निराकाराचा सागर आतां मोठा मेघ झाला आहे. (साकार झाला आहे) त्याने रूप घेतलं आहे. याआधी आलेले सगळे त्याचेच अंश होते. आतां पूर्ण तत्त्वं आलं आहे. या मेघाकडे वर्षेचं पाणी आहे. हे पावसाचं पाणी लोकांच्या मनाचं पोषण करीत आहे. त्यांच्या कुंडलिनी उत्थान पावूं शकतील अशा पातळीवर त्यांना हळूहळू क्रमाक्रमाने आणलं आहे. त्यांना त्यांचा आत्मसाक्षात्कार मिळाला आहे. आणि आतां हळूंहळूं त्यांच्या ज्ञानेंद्रियांवर, त्यांच्या बोटांच्या अग्रावर त्यांना संवेदना जाणूवं लागल्या आहेत. व्हायब्रेशन्सबद्दल कोणीही स्पष्टपणे बोललं नाही त्याचं कारण हेच आहे. चैतन्यलहरींबद्दल ते बोलूं शकले. त्याचं कारण म्हणजे त्याचं अव्यक्त स्वरूप. ती फक्त स्थिती होती. स्थिती, जी फक्त त्या स्थितीमध्येच अनुभवण्याची, जिचं स्थूलमध्ये प्रकटीकरण झालं नव्हतं. त्या स्थितीमध्ये ते मोहापलिकडे, मायेपलिकडे वगैरे जात होते, आपल्यासमोर तो पुरावा आहे. कसं काय ते ते करत होते; ब्रम्हचैतन्य काय होते, त्याचं प्रत्यक्ष रूप ते दाखवूं शकत नव्हते. जे कांही ते दाखवूं शकत होते ते फक्त उपमा आणि कांही उपदेशात्मक लघुकथा यांच्या द्वारेच दाखवूं शकत होते. आणि आतां मी हे साध्य केलं आहे - त्याचं प्रत्यक्ष रूप. सागरामधून ब्रम्हचैतन्याचं पूर्ण रूप मी आणलं आहे. मी तुम्हाला त्यामध्ये विरघळून जाऊ देत नाही. एका मोठ्या घटाच्या, मडक्याच्या स्वरूपांत मी त्याला बनवलं आहे. त्यामध्यें तुम्ही लहान लहान मडकी आहांत. दुसऱ्या शब्दांमध्ये, तुम्हा सर्वांना मी छोट्या पेशींच्या रूपांत माझ्या शरीरामध्ये सामावून घेतलं आहे. तुमचं पोषण करीत, काळजी घेत, तुम्हाला स्वच्छ करीत, ते कार्यान्वित करीत आहे. पण मी महामाया आहे. त्यामुळे मला फार हळू, सावकाश कार्य करावं लागतं, योग्य वेळी आणि योग्य ठिकाणी.

जेव्हां सातवं चक्र उघडलं त्यावेळी, सर्व चक्रं तुमच्या सहस्त्रारावर आली त्यामुळे तुमची सर्व चक्रं व देवता मी सांभाळू शकले. कोणत्याही दैवताला तुम्ही विचारा आणि तुम्हाला व्हायब्रेशन्स मिळतात. मी ब्रम्हचैतन्य आहे हे त्याने सिद्ध होतं. ब्रम्हचैतन्य म्हणलेच आदिशक्ति. आणि सदाशिवसुद्धां माझ्या हृदयांत आहेत. पण आतां मी इतकी माणसाळली गेले आहे कीं, ते शोधून काढणं तितकसं सोपं नाही. हे जर आधुनिक मानवाला सांगाल तर, त्याला तेसमजणार नाही. ते फक्त सहजयोगीयांनाच सांगता येइल. कारण त्यांना ते समजेल. हे सत्य पेलवणं इतकं कठीण आहे! स्वतःला स्वतःचा सामाजिक दर्जा सांभाळणं कठीण आहे; ते डळमळीत असतं. त्यामुळे माझ्यामध्ये ही सगळी अवतरणं सामावून घेतली आहेत. ही वस्तुस्थिती सहन करणं त्यांना फार कठीण जातं.

एकदा मी औरंगाबादला गेले होते. तिथे एका मुलाने मला असं सांगीतलं कीं, ब्रम्हचैतन्य हे जाणणं आणि जाणतां न येणं याच्यापलीकडे आहे. कोणत्यातरी पुस्तकामध्ये तसं त्याने वाचलं होते. मी त्याला म्हटलं, "ते सत्य आहे. पण ते विसरून जाऊन त्याने फक्त त्याची संवेदना घ्यावी. आणि मग त्यावेळीच मी असं ठरवलं कीं त्याविषयी थोड्या लोकांना सांगावं. असं पहा, ते मी उघड करण्यासांठी योग्य वेळही यायला हवी होती. आजवरचे सर्व धर्म विभाजित आणि असांघिक आहेत. आतां पूर्ण सुसांघिकता आली आहे. ख्राइस्ट, महंमदसाहेब व इतरांविषयी आतां मी समजावून सांगू शकते कारण, ते देखिल या पूर्ण ब्रम्हचैतन्याचे अविभाज्य भाग आहेत.

माझ्याविषयी शास्त्रज्ञांकडे बोलूं नका. त्यांना फक्त इतकंच

सांगा कीं, ही एक असामान्य पद्धत आली आहे समजून घ्यायला जरी थोडी अवघड असली तरी, ती प्रत्यक्षांत आली आहे. आणि आपण स्वतः ती पाहिली आहे. तशाप्रकारे तुम्ही त्यांना सांगू शकता. जर, माझ्याविषयी तुम्ही त्यांना सांगितलं तर, त्यांना धक्काच बसेल. जास्तींत जास्त तुम्ही त्यांना असं सांगू शकतां कीं, हे ज्ञान श्री माताजी निर्मलादेवी यांनी करून दिलं आहे, ज्यायोगे कुंडलिनी उत्थान पावूं शकते त्यांना ते कसं शक्य झालं, ते आम्हाला माहीत नाही. बहुतेक ते गुपीत असावं. साऱ्या गोष्टी माझ्यावर टाका. आतां तुम्ही समजून घ्या. बी कसं अंकुरतं? पृथ्वीमध्ये घालून. म्हणून सगळं कांही माताजींमध्ये घातल्यामुळें आमचं बी अंकुरलं आहे. ही जिवंत क्रिया आहे आणि आम्ही स्वतःच ती पाहिली आहे.

आजवर कोणीही इतरांना आत्मसाक्षात्कार देऊ शकलं नाही. एखाद दुसऱ्याने कदाचित दिला असेल इतरांना. बहुतेकांनी स्वच्छ करण्याच्या पद्धतीने ते साध्य केलं आहे. उदा. बुद्धाला स्वच्छ करूनच त्याचा आत्मसाक्षात्कार मिळाला. ब्रम्हचैतन्याने त्याच्यामध्ये हळूच शिरकाव केला कारण, त्यांनी ते मागीतलं. खरोखरच त्यांना ते हवं होतं, त्यासाठी त्यांनी प्रार्थना केली आणि त्यामुळे ब्रम्हचैतन्याने त्यांना स्वच्छ केलं. पण परत ते सुद्धा त्या स्थितीमध्ये गेले. त्यानंतर त्यासंबंधात कांहीच संपर्क नव्हता. आतां ते सगळं सामुहितेमध्ये आहे. ते सामुहिक कार्य आतां होत आहे कारण, त्या 'स्थिती' ने आतां स्वतःला व्यक्त करायला सुरूवात केली आहे.

समजा, तुम्ही विद्युतशक्तिचा शोध लावला आणि ते स्वतःकडेच ठेवलं, त्याविषयी कोणाशीही बोलला नाही तर इतरांना ते कसं कळणार? या महान संतांना ते व्यक्त करायचं नव्हतं असं नव्हे, पण त्यावेळी कांहीही संपर्क साधता येत नव्हता. एखाद्याला बघण्यांसाठी डोळेच नसले तर तुम्ही ते कोणाला दाखविणार? किंवा कोणाला सांगणार? तसंच होतं ते. ती स्थिती समजावून घेण्यासांठी, आत्मसात करण्यासांठी त्यावेळी तिथे कोणीही नव्हतं. ज्यांनी आत्मसाक्षात्कार मिळवला त्यांचं सहस्त्रार उघडलं पण ते त्यामध्ये हरवून गेले आणि तो सर्व अनुभव वैयक्तिक राहीला, सामुहिक आला नाही. आतां ते संपलं आहे. आतां ते सामुहिक आहे. एका ठराविक अवस्थेला सार कांही सामुहिक व्हावं लागतं.

या अवस्थेपर्यंत येण्यांसांठीसुद्धां, पुढच्या आजमावण्यासांठी कांही गोष्टी पाठवून पारख करण्यांत आली होती. शेवटी ख्रिस्ताला सुळी देण्यांत आलं. महंमदसाहेब, नानक, तुकाराम ते वैकुंठाहून आले होते आणि त्यांना कसं वागविण्यांत आलं ते पहा. त्यावेळी या गोष्टी कार्यान्वित झाल्याच नाहीत.

वैकुंठापलिकडचं सर्व कांही मला माहीत आहे. पण अजूनपर्यंत मी कांहीही प्रकट केलं नाही. हळूहळू ते माझ्याकडून उघडकीला आणण्यांत येइल. कारण ते आत्मसात करण्या इतपत लोकांची अजून तयारी झाली नाही. त्याचं असं आहे, ते खिचडी तयार करण्यासारखं आहे. अजून ती तयार होते आहे. तर तिला शिजूं दे. तुम्ही सारे त्यांत आहांत. आतां तयार करण्यांत येत असलेल्या लोकांची गुणवत्ता पूर्वीच्या काळांतील प्रेषितांच्या निवडक मूठभर शिष्यांबरोबर आहे आतां हळूहळू सावकाश इथे येणे प्रत्येकजणाच्या नशिबांत आहे. सर्वोच्च स्वयंपाक्याच्या या महान पातेल्यांत जे कोणी आतां पडतील ते त्यांत चांगले तयार होतील. जे बाहेर रहाणं पसंत करतील, ते बाहेर रहातील. ते सर्व कालातीत आहे. प्रत्येकाच्या आपापल्या साध्य करण्याच्या क्षमतेवर ते अवलंबून आहे. प्रत्येकाबद्दल त्याला सायकल शिकायला किंवा डॉक्टर व्हायला किंवा चार्टर्ड अकौंटंट व्हायला किती वेळ लागेल हे सांगणं जसं कठीण आहे तसंच आहे ते. कोणाला थोडाच वेळ लागेल इतरांना फार जास्त. वेळाचं बंधन मानवाने स्वतःच निर्माण केलं आहे. वस्तुस्थिती अशी आहे कीं, या शरीराला काळाचं बंधन नाही. स्वतःच्या संवयींमुळे मानवाने हे काळाची मोजमाप चालू केलं आहे. संवयी लावून घेण्याबरोबर काळ किंवा वेळाचं बंधन निर्माण झालं. जेव्हा संवय नसते त्यावेळी वेळाचं मोजमापचं नसतं.

सहजयोगामुळे तुमच्या अनेक संवयी सुटतात. पण त्यालाही वेळ लागतो. म्हणून तुम्हाला जर तुमच्या संवयींपासून मुक्तता करून घ्यायची असेल तर त्यांचं समर्थन करतां नये. समर्थन केल्याने संवयी राहातात. जर एका जीवनकालामध्ये तुम्ही आत्मसाक्षात्कार मिळवणं साध्य करतां तर, तुमच्यासंवयी सोडून देण्याचे क्षणही तुम्ही गाठूं शकता. मग या जीवनकालांतच ती स्थिती प्राप्त करणं तुम्हाला शक्य होइल. जर या एका आयुष्याचा प्रक्रीयेमध्ये तुम्ही अर्धेकच्चो राहिला तर तुमचं साध्य साधण्यांसाठी तुम्ही परत याल. आतां कांही काळासांठी सहजयोग अशाप्रकारे कार्यान्वित होइल. आतां हा शेवटचा निवाडा आहे. जेव्हां सहजयोगाच्या प्रकटीकरणाच्या प्रक्रीयेमध्ये जेव्हा मी कांही लोक विरूद्ध दिशेने वागतांना पहाते, तेव्हा मला आश्चर्य वाटतं. कधी कधी मला इतका वाईट अनुभव येतो, पण मग ते लोक सहजयोग सोडून देतात, असं होतं पण त्यामुळे तुम्ही हवालदिल होतां नये. तुमचं सर्वोत्तम परिश्रम लावून तुम्ही त्यासांठी झटून कार्य केलं पाहिजे.

नेहमी मध्यांत रहा. सहजांतील तुमच्या वाढीची काळजी करूं नकां. एकदा तुम्ही मध्यांत असला कीं वाढ आपोआप होते. आधीच माझ्याकडून तिचं पोषण होत आहे. दररोज तुम्ही डावीकडून उजवीकडे जाता. तुमच्या संवयींमुळे तुम्ही डावीकडे जातां आणि तुमच्या आकांक्षांमुळे उजवीकडे. तुमच्या हृदयांत मला बसवणं हा भाव आहे किंवा संवेदना आहे. त्यामुळे मी तुमच्या हृदयांत यावं यासांठी तुम्ही जशा डावीकडच्या संवयी विकसित करता त्याप्रमाणे, याही संवयीसांठी 'भाव ठेवण्याचा' सराव केला पाहिजे. इतक्या संवयी तुम्ही मिळविता तर हा सुरेख भाव तुम्ही कां मिळवणार नाही? हे सारं, दुसरं कांहीच नाही, फक्त भावांतला बदल आहे. नाहीतरी, संवयी ही मनाची एक स्थिती असल्याने त्या लवकर बदलता येतात. एकदां कां तुम्ही तुमच्यामध्ये माझा भाव प्रस्थापित केला कीं तो तुमच्या संपूर्ण शरीरांत त्याची जागा घेतो. आणि स्वतःला अनंतापर्यंत नेतो. त्यामध्ये तुम्ही

स्वतःला किती वापरतां यावर ते अवलंबून असतं. तुमच्या खोलीमध्ये तुम्ही बराचसा धूर केला, तर सर्वच डांस पळून जातात. त्याप्रमाणेच ते आहे. तुमच्या हृदयांत मला तुम्ही केव्हढं स्थान दिलं आहे, त्यावर ते अवलंबून असतं.

आतां असा प्रश्न उद्भवतो कीं, तुमच्या हृदयामध्ये माझा भाव असण्याची स्थिती कशी काय प्रस्थापित करायची? असं उत्तर आहे कीं, सतत तुमचं स्वतःचं चित्त थांबवून स्थैर्य येतं. नेहमी 'चित्त निरोध' करा. जसं तुम्ही बाहेर जातां आणि कांहीतरी बघता त्याप्रमाणेच तुमचं चित्त त्याकडे जाणं तुम्ही जाणीवपूर्वक थांबविलं पाहिजे. सरावाने ते करतां येतं. त्याला आंत ओढून घ्या. त्याला अलिप्तता म्हणतात. संपर्क किंवा बाह्य जगताशी संबंध हा नेहमी चित्तामधून होत असतो. हे लक्षांत ठेवा. ते कुठे जात आहे. याकडे सतत लक्ष ठेवा. ''माझं चित्त कुठे आहे.' हा प्रश्न स्वतःला नेहमी विचारा. खरं तर, आपल्यामध्ये चित्त हे, आपली शुद्धीवर असण्याची अवस्था व जाणीव (कॉन्शसनेस आणि अवेअरनेस) यांमध्ये विभक्त केलं गेलं आहे. जेव्हा आपली शुद्धावस्था जाणीवेबरोबर एकत्रित होते त्यावेळी ती चैतन्यलहरींच्या जाणीवेचं रूप धारण करते. जी चैतन्यलहरींची जाणीव तुम्हाला संतुलनांत ठेवते. आणि हे संतुलनच तुम्हाला मध्यांत ठेवतं. ज्याक्षणी तुमचं चित्त चुकीच्या दिशेने जातं त्यावेळी तुमच्या संवेदनेमध्ये तुम्हाला उष्णता जाणवते. तशाप्रकारे सर्वव्यापी चैतन्यशक्ति कार्यान्वित होते आणि तुमच्यामध्ये वाढत रहाते.

आपले सर्व संस्कार आणि संवयी मेंदूला सुरकुत्या आणतात. आणि मेंदूमध्ये गुंडाळ्या म्हणून दृष्टोत्पत्तिस येतात. ज्यावेळी या सर्व गुंडाळ्या उघडतात. त्यावेळी जास्त शोषणशक्ति असलेल्या नव्या जागा उघडतात. तशाप्रकारे देवत्त्वाशी संधान साधलं जातं.

शास्त्रज्ञांना मुळापासून आश्चर्य वाटलं पाहिजे. मी मेडिकल इंस्टिट्यूटला गेले आणि त्यांना पॅरासिम्पथेटिक मज्जासंस्थेविषयी सांगीतलं त्यावेळी ते थक्क झाले तसं. ॲड्रेनालिन, स्टिरॉनिलॉन यांची कार्यपद्धति त्यांना स्पष्ट करतां येत नाही, पण आपल्याला सांगता येते. आतां कार्बन घ्या, त्याच्याकडे जर तुम्ही डावीकडून पाहिलं तर उजवी बाजू दिसते. तसंच त्याउलटसुद्धां. डाव्या बाजूने कार्बनची आकृति स्वास्तिकाच्या स्वरूपांत दिसते, उजव्या बाजूने ती ओंकारासारखी दिसते. हे सत्य आहे कीं, मानवी मेंदूच्यावर सर्वव्यापी शक्ति आहे. परमचैतन्य किंवा सर्वव्यापी शक्ति ही सर्व बाजूंनी येऊन गर्भाच्या मेंदूवर (गर्भ तयार झाल्यावर) आदळत असते.

खरं तर असं होतं कीं, पिरॅमीडच्यासारखा आकार असणाऱ्या मेंदूच्या वरच्या टोकांतून; कांही अडथळा न येतां जाऊन, परमचैतन्य मणक्यांच्या खाली असणाऱ्या माकडहाडामध्ये प्रस्थापित होतं. तिथे ते साडेतीन वेटोळे करून कुंडलिनीशक्तीच्या रूपाने राहातं. येण्याच्या प्रक्रीयेमध्ये मणक्यामध्ये एक पोकळी सोडली जाते. ज्याला पोकळवाहिनी (व्हॅक्यूम चॅनेल) म्हटलं आहे. आतां त्रिकोणाकृती मेंदूच्या बाजूंवर आदळणारं परमचैतन्य मेंदूच्या ग्रे (करड्या) आणि पांढऱ्या भागांमध्ये झिरपायला हवं. या भागांना त्यांची स्वतःची घनता (डेन्सिटी) असते. त्यामुळे पदार्थविज्ञानशास्त्रांमधील वक्रीभवनाच्या नियमांनुसार (लॉ ऑफ) चैतन्य डावीकडून उजवीकडे आणि उजवीकडून डावीकडे वक्रीभवन होऊन पुढे जाते. याला 'प्रिझ्मॅटिक रिफ्रॅक्शन इफेक्ट' असे सुद्धां म्हणतात. (लोलकीय वक्रीभवनाचा परिणाम). ही प्रक्रीया बहुतांशी मानवी मेंदूमध्ये आढळते आणि जनावरांमध्ये नसते.

ही वक्रीभवनाची क्रिया होत असतांना मानवी चित्त दोन्ही बाजूंना ओढलं जातं आणि बाहेरच्या दिशेने पिटाळून लावलं जातं. बाहेर जात असतांना चित्त आणि वक्रीभूत चैतन्य दोन्ही आज्ञाचक्र ओलांडून जातात. या ओढण्यामुळें एक जास्तीचा जोर त्याला 'परिणामी प्रेरणा-जोर' (रिझल्टंट फोर्स) म्हणतां येइल त्याची निर्मिती होते.

आतां 'पॅरॅलोग्रॅम ऑफ फोर्सेस'च्या सिद्धांतानुसार ही परिणामी प्रेरणा'दोन गटांत विभागली जाते. कारण डाव्या उजव्या, दोन्ही अंगांशी ते एकमेकांशी काटकोनांत (९० मध्ये) असतात. परिणामी प्रेरणा स्वतःच्या दोन सारख्याच भागांच्या मध्यामध्ये कार्य करते.एक भाग गर्भाच्या शरीरांत जाण्याचा स्वतःचा मार्ग तयार करीत असतांना डावी आणि उजवी सिंपथेटीक चॅनेल तयार करतो. दुसरा भाग ज्ञानेंद्रियांतून बाहेर पडण्याचा रस्ता तयार करीत असतांना त्याच्यासमवेत डावीकडे आणि उजवीकडेसुद्धां मानवी चित्त ओढून घेतो. दुसऱ्या भागाला बाह्य जगतांत 'क्रिया' असेही संबोधितात. या क्रियेला बाह्य जगतामधून 'प्रतिक्रिया' तयार होते. (पदार्थविज्ञान शास्त्राचा दुसरा विख्यात नियम) क्रिया व प्रतिक्रिया यांनी अनुसरलेला मार्ग तोच असतो. डाव्या बाजूला या प्रतिक्रियेमधून रूढी, नियम, आचारसंहिता तयार होतात. याउलट उजवीकडे अहंकार तयार होतो.

थोडक्यांत आपलं चित्त ब्रम्हचैतन्याच्या परिणामी प्रेरणेबरोबर बाह्य जगतामध्ये गेलं, त्याने प्रतिक्रिया गोळा केली, येतांना त्याच्याबरोबर डावीकडचं कंडिशनींग रूढी, चालिरिती इ. घेऊन आलं ज्यामुळे मानस अथवा मन तयार झालं. क्रिया आणि प्रतिक्रिया दोन्ही आज्ञा व विशुद्धी दोन्ही चक्रांमधून जातात. निसर्गामध्ये विखुरलेल्या चित्तामध्ये पूर्ण शरीरांतून वहाण्याची क्षमता असते. डाव्या बाजूची प्रतिक्रिया म्हणजे इच्छातत्त्व असतं. त्याचं पोटेन्शिअल (अव्यक्त पण प्रभाविरित्या व्यक्त होण्याची शक्ति असणारं तत्त्वं) डाव्या सिंम्पथेटिक मार्गावर इडा नाडीला जन्म देतं. त्याचप्रमाणे उजव्या बाजूकडची प्रतिक्रिया म्हणजेच क्रियाशक्तिचं तत्त्व (पोटेन्शिअल) - पिंगला नाडी तयार करतं. इडा नाडी जेव्हां भरून वहाते तेव्हां ती आज्ञचक्रामागे आज्ञाचक्रामागे फुग्यासारखा एक ढग तयार करते. ज्यालाच आपण प्रतिअहंकार म्हणतो त्याचप्रमाणे पिंगला नाडी भरून वहाते तेव्हां आज्ञाचक्राच्यापुढे तशाच प्रकारचा ढग तयार होतो. त्याला आपण अहंकार म्हणतो. या दोन फुग्यांच्या बरोबर मध्यांत आज्ञा असते. आज्ञेच्या पुढचा भाग मेंदूमधील पिट्युटरी ग्रंथीच्या अंमलाखाली असतो. आणि मागचा भाग पिनीअल बॉडीच्या ताब्यांत असतो.

कुंडलिनी जेव्हां आज्ञाचक्रामध्ये प्रवेश करते तेव्हां ती त्याला प्रकाशित करते. तेव्हा तुमच्यामधील ख्रिस्त प्रकाशित किंवा जागृत होतो. अहंकार आणि प्रतिअहंकाराचे हे दोन्ही फुगे तो शोषून घेतो आणि संपूर्ण आज्ञाचक्र उघडतं. आणि त्यासाठीच आपल्या पापांसाठी ख्रिस्ताचा मृत्यू झाला. त्याचवेळी त्याबरोबर सहस्त्रार उघडतं. विराटाचं सहस्रार उघडतांना मी पाहिले. ज्योतीच्या हजारो जिभांसारखं ते होतं. तुम्ही जेव्हा मानवी मेंदूचं विच्छेदन करतां, तेव्हां त्याच्या मध्यभागी पिवळं भोक असतं. सहस्त्राराचं उघडणं फार अकस्मात असतं. मोठ्या धूमधडाक्याने ते उघडतं. मी ते कशाप्रकारे समजावून सांगू? एक टेलीस्कोप दुसऱ्यामध्ये घालावा, तसा देखावा असतो तो. सर्वसाधारणपणे आज्ञा आणि विशुद्धी उघडल्याने, अहंकार, प्रतिअहंकार शोषले जातात. मन प्रतिअहंकार आहे. इगो हा अहंकार आहे. आपला आत्मा हा पांचही तत्त्वे आणि त्यांच्या (कॉजल एक्स्प्रेशन्स) तन्मात्रा यांनी वेढलेला असतो. त्याशिवाय परिघावर असलेली कुंडलिनी. ही मुख्यतः पृथ्वी, जल आणि त्याचं तन्मात्रा, फक्त ज्योतमात्रा आहे.

जेव्हां आत्मसाक्षात्कार होतो त्यावेळी दैवतं जागृत होतात; चक्रांचं पोषण होतं, ती ताजीतवानी होतात. ती उघडतात, शक्तिची मुक्तता करतात. पीठांमध्ये (आपल्या चक्रांचे प्रतिनीधीत्व करणारी मेंदूमधील स्थाने) त्या त्या चक्रांशी संबंधित सर्व क्रिया चालू होतात. दोन्ही पातळ्यांवर व्यवस्थित मांडणी चालू होते. आणि सर्व चक्रांचं पूर्णत्त्व चालू होतं. तुमच्या मनाचं उदाहरणं घ्या. त्याला कांहीतरी करायचं असतं. तुमचं शरीर, त्याला कांहीतरी करायचं असतं. तिसरी गोष्ट तुमची बुद्धी, तिला कांहीतरी करायचं असतं. तिथे अखंडत्त्व नसतं. आत्मसाक्षात्कारानंतर तिन्ही एक होतात.

दुसरं, कपड्याच्या तुकड्याचं उदाहरण घ्या. समजा, ते चित्ताचं प्रतिनिधित्त्व करीत आहे. आत्मसाक्षात्काराआधी ते सगळं सर्व दिशांमध्ये विखुरलेलं असतं. आतां, एक बोट कापडाच्या मध्यभागी ठेवा, तळापासून वर उचला. काय होतं? त्या क्रियेमध्ये कापड एका बिंदूपर्यंत वर उचललं जातं. आणि बाकीचं बोटाभोंवती पडतं. त्याचप्रमाणे ज्यावेळी कुंडलिनी वर उठते त्यावेळी चित्ताला टोचते; त्याला सहस्त्रारापर्यंत घेऊन जाते, जिथे ब्रम्हचैतन्याच्या प्रकाशामुळे ते चित्त प्रकाशित होतं नंतर ते त्याभोंवती गुंडाळलं जातं आणि मध्यमार्गातील सुषुम्ना नाडीच्या मार्गामध्ये येतं. खरोखर, झालेलं जे कांही आहे ते असं कीं, आत्मसाक्षात्कारानंतर बरहेरच्या ऐहिक जगामध्ये पसरलेलं आपलं चित्त आंत ओढलं जातं आणि त्यामुळे ते आलोकित होतं. 'स्थितो' म्हणतात ती ही आहे. पण वास्तवतेमध्ये आपण मानवप्राणी. आपण संवयीचे गुलाम आहोत. फक्त आपल्यासंवयीमुळे आपण आपल्या चित्ताला त्या स्थितीमध्ये कायम टिकूं देत नाही.

खरं तर चित्ताने बाहेर जायला नको. ही साधी परिस्थिति इथे सांगते ज्यांत तुमच्याबरोबर मीसुद्धां आहे. समुद्रप्रवासाला नेण्यासांठी मी तुम्हाला बोटीमध्ये ठेवते आहे. पण तुमचा एक पाय सतत पाण्यांत टाकून तुम्ही माझ्या मदतीचा अव्हेर करीत आहांत. तुमचं चित्त क्षुल्लक गोष्टींकडे आहे. तुम्हाला पलीकडे नेण्यासांठी मी आंत बसले आहे, हे तुम्हाला नीट माहीत आहे. तरीसुद्धां, तुमच्या संवयीमुळे तुम्ही पाय बाहेर काढीत आहांत, तुमचा पाय मगर कधीही खाऊन टाकेल, हे देखील मला दिसतं आहे, पण तुम्ही, तुमच्या स्वतःच्या संवयीमुळे त्या मगरीकडे लक्ष न देण्याइतके आंधळे झाला आहांत. आतां माझी स्थिती काय आहे याची तुम्ही कल्पना करूं शकतां कां? मला कसं वाटतंय याची कल्पना करा.

म्हणून, मी सांगते, 'सत्संग करा.'. त्याचा अर्थ आपलं चित्त मध्यावर ठेवण्यासांठी इतर सहजयोगीयांच्याबरोबर वेळ व्यतित करा. सतत तुमचं चित्त मध्यांत ठेवणं हे महत्त्वाचं आहे. आत्मसाक्षात्कारानंतर दैवी शक्ति प्राप्त झाल्यामुळे आपल्या व डाव्या व उजव्या नाड्या काळजीमुक्त, शिथील होतात ताणतणावांतून मुक्त झाल्याने चक्रं जास्त उघडतात. ते एक चक्रच आहे. मग कुंडलिनीचे जास्त धागे वर येतात आणि असं चालू रहातं. या स्थितीमध्ये आपल्या चित्तामध्ये मध्यांत रहाण्याची गुणवत्ता प्रस्थापित होते. त्यानंतर तुम्ही त्याला एखादे विशिष्ट काम करण्यासांठी त्या दिशेने बाहेर पाठवूं शकता. आणि ते साध्य झाल्यावर कांहीही प्रतिक्रिया न होतां, त्याच्या मध्यांतील जागेवर परत येऊन ते स्थानापन्न होतं. आतांपर्यंत कोणत्याही गोष्टीला न चिकटण्याची गुणवत्ता त्याने मिळविली असते.

माझ्याबाबतीत ते वेगळं आहे. माझं लक्ष जर तुमच्याकडे असेल तर, तुमचे सर्व प्रश्न मी माझ्यामध्ये घेते, स्वच्छ करते आणि मी स्वतः त्रास सहन करते. हे जर मला करायचं असेल तर मी करते. आतां, मला सहजयोगीयांना ठीक करायचं असतं. कारण तारतम्य न बाळगतां, माझ्या शरीरांत मी त्यांना ठेवलं आहे. त्यामुळे त्रास मला सहन करावा लागतो. याबाबतीत सहजयोगी स्वतः बॅरोमीटर (वायुभारमापक) आहेत. मला सहन करावं लागतं. तसा त्रास त्यांना सहन करावा लागत नाही. कदाचित होतही असेल थोडाफार - याचं कारण, ते जे शोषून घेतात ते विशाल सागरामध्ये जातं.

आतां रशियामध्ये जड वस्तूच्या पांचव्या पातळीचा (डायमेन्शनचा) बायोप्लाझ्माचा - अभ्यास चालू आहे. ही पूर्णपणे उजवीकडील क्रिया आहे. प्रत्येक माणसाला स्वतःचं तेजोवलय (ऑरा) असतं. आणि त्याच्यामधील गुणांच्या बदलानुसार ते गुण ज्यांचं प्रतिनिधीत्त्व करतात ते रंग किंवा तेजोवलय बदलतं? तुम्ही बंधन कशाला देतां? तुमच्या तेजोवलयांना. त्यांना संरक्षण देण्यासांठी. फक्त जड वस्तूला तेजोवलय असतं. तेव्हां ते सगळं जड आहे. ही पांचवी डायमेन्शन वास्तविक मायक्रोस्कोपिक आणि फोटोग्राफिक (फोटो काढतां येण्याजोगी) आहे. त्यामुळे माझ्या फोटोमध्ये तुम्हाला जेव्हां प्रकाश दिसतो, ती एक प्रकारची ऑरा, तेजोवलय असतं. असं आहे, ब्रम्हचैतन्याला त्याचा स्वतःचा प्रकाश आहे. तो फक्त मलाच दिसतो. कांही लोकांना त्यांची आज्ञा खराब असते त्यावेळी तो दिसूं शकतो.

त्यांना तो बाहेरून दिसतो. त्याचं तत्त्वं असं आहे कीं, जेव्हां तुम्ही त्याच्यापासून दूर असतां तेव्हां तुम्ही पाहू शकता. पण, जर तुम्ही त्यामध्येच असाल तर काय पाहू शकणार?

निर्विचार जाणीव तेव्हां येते जेव्हां तुमची कुंडलिनी आज्ञाचक्र ओलांडते. जेव्हां तिथे विचारच नसते. नियमन केल्याने ते होतं. हळूहळू ते तुमचा एक भागच बनतो. आणि तुमच्या सर्व शरीराला वेढून टाकतो. ती स्थिती बनते. ही निशंःक जाणीव (डाऊटलेस अवेअरनेस) असते. तुम्ही ब्रम्हचैतन्य बनता किंवा ती स्थिती बनता.

या स्थितीमध्ये सर्वांनी कार्य केलं पाहिजे. नुसतं त्या स्थितीला पोहोचून समाधीमध्ये जातां नये. तुम्हांला न देतां तुमच्यासांठी मी ते साध्य केलं आहे. मग तुम्ही त्यासांठी पृच्छा कां करतां? तुम्हांला समजलं पाहीजे कीं, तुम्ही तिथे आहांत. त्याबद्दल शंका नको. आतां ही शेवटीच लिला आहे. वास्तवतेमध्ये ही स्थिती मिळवणं सुलभ आणि सहजसाध्य आहे. पण तरीही त्यांसाठी तुम्ही श्रम घेतले, प्रयत्न केले तर मला आवडेल. जेव्हा ही अवस्था आत्ताच्या आत्ता आणि तुमच्या स्वतःच्यासांठी मिळवावी, असं तुम्हाला वाटेल, तेव्हां तुम्ही स्वार्थी आणि एकप्रकारे पलायनवादी आहांत, असं मी म्हणेन. प्रथम तुम्हाला सामुहिक बनलं पाहिजे. नाहीतर वैयक्तिकरित्या निराकारामध्ये तुम्ही हरवून जाल. आणि मलादेखील तुम्ही पाहू शकणार नाही. असं पहा, तुम्ही त्या स्थितीमध्ये असाल, सागरांत विरघळून जाल. तर, सागरामधून उत्क्रांत पावणं आणि त्यांत विरघळून जाणं यामध्ये कांहीही असामान्य, महान नाही. पण सागरामधून मेघ होणं, आणि आपल्या पावसाच्या पाण्याने सर्वांना चिंब करणं भिजून हे खरोखर असामान्य कर्तृत्त्व होइल. हे माझं ध्येय आहे आणि हीच माझी लिलापण आहे. प्रत्येक क्रीडेचं कांहीतरी ध्येय असतं, तसंच माझ्याही क्रिडेचं आहे.

मध्यांत रहाण्यासांठी शरणागत व्हा, "श्री माताजी, तुम्ही सारं कांही करता." असं म्हणा. ते पूर्ण समर्पण आहे. शास्त्रीय मनाला ही विद्या तुम्ही छोट्या छोट्या तुकड्यांनी द्या. जर, त्यांचा पेला भरलेला असेल तर, त्यांच्या क्षमतेहून जास्त तुम्ही भरूं शकत नाही. तुमचा संयम ठेवा. सगळा सागर तुम्ही त्यांना आतांच देऊ शकत नाही. लक्षांत ठेवा, शास्त्र (सायन्स) हा पूर्ण ब्रम्हाचा अगदी थोडासा भाग आहे. पहिल्यांदा त्यांना ओळख करून द्या, सहजाबद्दल त्यांच्यामध्ये आतुरता जागृत करा. एकदां ते आले कीं त्यांचं निरीक्षण करा. तुमची वेळ आठवते कां? तुम्हां प्रत्येकाबरोबर हेच झालं आहे. पहिल्यांदा तुम्ही अनुभव घेतलांत मग उत्तरोत्तर आतुरता वाढत गेली ही प्रक्रीयादेखील शास्त्रीय आहे.

पैसे मिळविण्यासांठी ऐहिक जगांमध्ये तुम्ही कार्य करीत असतांना तुम्हाला मायेशी सामना करवा लागेल माझ्यासांठी तुम्ही कमवित आहांत एव्हढं लक्षांत ठेवा. तेव्हढंच पुरेसं आहे. पुढे व्हा. आणि जेव्हढा पैसा मिळवता येइल, तेव्हढां मिळवा. हे मी फक्त लौकिकार्थाने म्हणते आहे.

तुम्हा सहजयोगीयांकरवी सहजयोगामध्ये येणारे लोक माझ्यामुळे सहजयोगांत येणाऱ्या लोकांपेक्षा जास्त बरे. कारण असं कीं, माझ्यामुळे ते माझ्या मायेमध्ये गुरफटण्याकडे जाऊ शकतात. पहा, नवीन येणाऱ्या लोकांना माझ्या मानवी स्वरूपांत मी कोणीच नसते.

अपस्मार (एपिलेप्सी)

कारण : चित्ताचं चलन अतिशय डावीकडे गेल्यामुळें तुम्ही कलेक्टिव्ह सबकॉन्शसच्या अवस्थेमध्ये जातां. डावी बाजू कमजोर असल्याने, कशाबद्दल भिती बाळगल्याने, किंवा भय वाढून हे होतं. एखाद्या ॲक्सिडेंटमध्ये तुम्ही सांपडलात, अचानक भिती किंवा धक्क्यांमुळे.

उपचार : चित्त मध्यभागी आणा. ते करण्यासांठी गायत्रीमंत्र म्हणून ते उजवीकडे आणा. मग ब्रम्हदेव सरस्वतीचा मंत्र म्हणून ते मध्यभागी आणा. उजवीकडे गेल्यावर तुम्हांला चैतन्यलहरी जाणवूं लागतील. त्यावेळी थांबा आणि जास्त गायत्रीमंत्र म्हणूं नका कारण, तुम्ही जास्त उजवीकडे जाता नये. जास्त उजवीकडे जाणं म्हणजे व्हायब्रेशन्सची फ्रिक्वन्सी कमी होऊ लागणं.

कॅन्सर आणि इतर सायकोसोमॅटीक रोगांसाठीसुद्धां ही उपचारपद्धती सारखीच आहे. त्यांत (अस्थी व स्नायूंचे कांही विशिष्ठ रोग येतात) स्नायूंच्या रोगांमध्ये तुमच्या श्री गणेशामध्ये सुरळीतपणा भंग झाल्याने अडचणी उद्‌भवतात. हिस्टेरेक्टमीमध्ये, जिथे गर्भाशय काढलं जातं तिथे श्री गणेशांच्या बाबतीतच अडचण असते. आणि भीतीसुद्धां कारणीभूत असते. जर कोणाला मूल होत नसेल तर डाव्या स्वाधिष्ठानात अडचण असते तेच प्रश्न मासिक पाळीचा स्राव जास्त असल्यासदेखील असतात. माकडहाडाच्या भागांतील पॅरासिंपथेटीक जास्त उत्तेजित झाल्याने स्राव जास्त होतो. दुसरे परिणाम डायरिया आणि सारखे लघ्वीला जावे लागणे, असंही असतं.

उपचार : सुरूवातील गायत्रीमंत्र. पण त्याबरोबर कांही औषधंसुद्धा दिली पाहिजेत. तुम्ही ओव्याची धुनी देऊ शकता. (सर्जरीच्या रूग्णालाही) लम्बॅगो-पाठदुखीसांठी ओव्याचं पाणी. स्नायूंच्या पाठदुखीला. ओवा हा खाण्यासांठी आणि गेरू फक्त लावण्यासांठी. लम्बॅगोमध्ये हाडं वळतं म्हणून चैतन्यदिलेलं केरोसीनतेल दुसऱ्या कोणत्याही तेलामध्ये मिसळून वापरा. थोड्या दिवसांत ते ठीक होतं.

पण कोणत्याही उपचारांसाठी एक गोष्ट लक्षांत ठेवा कीं, महत्त्वाची गोष्ट ही कीं, सर्व कांही तुमच्या इच्छाशक्तिवर अवलंबून आहे. तर इडा नाडी अशाप्रकारे महत्त्वाची कीं इच्छा असली पाहिजे आणि ती योग्य इच्छा पाहिजे. चूकीची इच्छा नको कारण शेवटी सगळं कांही परत इच्छेवर जातं. जर तुमची इच्छा अयोग्य असेल आणि तुम्ही क्रिया केली तर सगळं मेकॅनिकल यांत्रिक आणि दांभिक होतं. योग्य इच्छा म्हणजे फक्त तुमची वाढ साध्य करणं. ती शुद्ध इच्छा आहे. जर तुमची स्थूलांतली इच्छा असेल जशी, मला मुलगा हवा वगैरे. तर तोदेखिल

मिळेल. पण मग तुम्हाला आणखीही कांही हवं असेल. त्याचा अर्थ आतां तुम्ही दांभिक बनत चालला आहांत. पवित्र इच्छेमध्ये तुम्हाला सगळं कांही त्यांतच मिळतं.गाठोडे बांधून. खऱ्या इच्छेमधून तुमची वाढ होते. ही सगळी कल्पना म्हणजे तुमच्या इच्छाशक्तिविषयी असणारा तुमचा दृष्टीकोन आहे.

आतां तुमची क्रियाशक्ति घ्या. त्याला दोन अंगे आहेत. म्हणजे शारिरीक आणि मानसिक. शारिरीकरित्या तुम्ही खाली बसलं पाहिजे. आणि निर्विचार होण्यासांठी ध्यान केलं पाहिजे. मानसिकरित्या तुमचं लक्ष स्थूलांतल्या निरर्थक गोष्टींकडे जात नाही हे तुम्ही पाहिलं पाहिजे. तुम्ही इतकंच म्हटलं पाहिजे कीं, "श्रीमाताजी, तुम्ही सर्व कांही करीत आहांत. मी कांहीच करीत नाही. "हे. तुमच्यावरील नियंत्रण आहे.

डाव्या आणि उजव्या, दोन्ही बाजूंच्या व्यक्तिंसाठी प्रथम स्वतःला स्वच्छ करून ध्यान करणं महत्त्वाचं आहे. तुम्ही जेव्हां डावीकडे जाता, तुमची कुंडलिनी वर उचला आणि ती वर येते. ध्यानाआधी तुम्ही कुंडलिनी वर उचलली पाहिजे. पुजा करतांना अगदी यांत्रिक होऊ नका. आपली वाढ व्हावी अशी तुमची खरी इच्छा पाहिजे. आर्य समाजांतील लोक हे मूलतः उजवीकडचे लोक आहेत. त्यांना भक्ति, भजन केलं पाहिजे. मला त्यांच्या हृदयामध्ये बसविलं पाहिजे. म्हणजे डावीकडे गेलं पाहिजे. फक्त मध्यांतल्या चक्रांवर मंत्र म्हणून स्वच्छता राखली पाहिजे. महाकाली आणि महासरस्वती दोघी दोन्ही बाजूंनी चक्रांवर कार्य करतात आणि त्यांची अंतर्गत सांगड असते. डावीकडचे आणि उजवीकडचे मंत्रसुद्धां कुंडलिनी वर चढविण्यासांठीच फक्त म्हणावयाचे आहेत. या ठिकाणी चित्ताचा कांही उपयोग नाही. कुंडलिनी वर चढविण्यासांठी मंत्र म्हणून डाव्या बाजूसांठी करायची ट्रीटमेंट (उपचार) फक्त तुमची इच्छाशक्ति वाढविण्यासांठी आहे.

दुसरा मार्ग म्हणजे तुमची उजवी बाजू वर करायची आणि हाताने ती डावीकडे खाली आणायची. त्याने खूप मदत होते. याशिवाय तुमची उजवी बाजू ब्रम्हदेव व गायत्रीमंत्राने कार्यान्वित करायची. पण सगळं कांही एका पॉईंटपर्यंत. आणि ते जास्त दुसऱ्या बाजूला जाण्याआधीच त्याला वर ओढून मी त्यावर नियंत्रण ठेवते. ते सर्व माझ्या ताब्यांत असतं. जेव्हां लोक नियंत्रण ठेवीत नाहीत आणि नुसते राम राम पांडुरंग-पांडुरंग करीत जातात आणि एका बाजूला पूर्णपणे हरवून जातात.

आतां श्री माताजी सर्वांना विचरीत आहेत. "तुमचं चित्त कुठे आहे?" पहिल्यांदा भक्तिभाव आला पाहिजे आणि मग तो श्रद्धा भाव झाला पाहिजे.

फिजीओथेरपीबाबत :

जेव्हां चैतन्यलहरी लागतात तेव्हा त्या स्नायूंना रिलॅक्स शिथील करतात खरंतर ताणतणावातुळे स्नायू आकुंचनांत जातात. उदा. डावीकडे किंवा कोणतंही चक्र मणके वळूं लागतात. जेव्हां तुम्ही तुमची चक्रं माझ्या घालतां - (माझ्या काळजीखाली, त्यावेळी ती शिथील होतात होतात आणि मग चैतन्यलहरी देऊन तुम्ही ती नीट सरळ करूं शकता. ही व्हायब्रेशन्स इतरांना देऊ शकता. दुसऱ्या व्यक्तिला तुम्ही स्पर्श करण्याची गरज नाही. पण मंत्रांचा वापर करून हातांना गोल फिरवून व्हायब्रेशन्स देऊ शकता.

डाव्या बाजूच्या रोगांसाठी - तुम्ही कलेक्टिव्ह सबकॉशन्समध्ये- (सामुहिक सुप्तचैतन्य) गेला असतां जियून तुम्ही प्रोटीन ५२, व्हायरसेस गोळा करता. कांहीवेळां तुम्हाला ते कांही मदत मिळण्यापलिकडे घेऊन जातात. ज्यांचं लिव्हर खराब झालं आहे, ज्यांचं लिव्हर फार जास्त काम करीत आहे. ते गरम झाले आहेत त्यांना ताप येतो. लिव्हरवर बर्फ ठेऊन ते नीट करतां येतं. कांही मदत करतां येतं. मलेरियाचा ताप उजवीकडचा आहे. म्हणजे डांस चावण्याने झालेला बॅक्टिरीयापासून झालेले ताप डाव्या बाजूकडचे आहेत. ते मुख्यत्वेकरून कांही प्रकारचे अन्न खाल्ल्याने, उदा - फंगस - मश्रुमसारखे - जुनं पनीर वगैरेमुळे होतात. डायबिटीस हा उजव्या बाजूकडील क्रियेमुळें असतो. जिच्यावर डाव्या बाजूचा परिणाम असतो कारण, इथे उजवी बाजू सहज परिणाम होइल अशी कमजोर झालेली असते. पहिल्यांदा जेव्हा तुम्ही खूप विचार करतां, लक्ष देत नाही आणि त्याच संवयीत रहावा. त्यावेळी तुमच्या या नाजुक कमकुवत बाजूत आणखी भितीसुद्धां प्रवेश करते. खूप काम करणारा माणूस खूप विचार करतो. त्याच्या सर्व फॅटच्या पेशी मेंदूसांठी वापरल्या जातात. स्वाधिष्ठान काम करूं लागतं. आणि त्याचा डाव्या बाजूचा भाग दुर्लक्षित रहातो. डाव्या बाजूकडील शक्तिचा ऱ्हास होतो. आणि तुम्ही आणखी नाजुक होता अशावेळी तुम्हाला कशाची भिती वाटली, तर दोषी वाटूं लागते आणि मग तुम्हाला डायबेटीस होतो.

ठीक करण्यासांठी मंत्रामध्ये अलीचं नावं वापरा. त्याचा उगम डावीकडच्या स्वाधीष्ठान व नाभीमध्ये आहे. पहिल्यांदा डावी नाभी. बायकोची भिती किंवा तिच्या विषयीची काळजी, किंवा कुटुंबातील इतर व्यक्तिविषयी वाटणारी काळजी त्याशिवाय त्यावेळी असणारा तुमचा कमकुवतपणा डायबिटीस आणतो. तुमचं आज्ञाचक्र साफ करून तो काढून टाका. जास्त विचार करूं नका. निर्विचारामध्ये जा. डावी बाजू उजवीकडे घ्या. मीठ जास्त घ्या. म्हणजे साखर बाहेर पडण्याच्या क्रियेचं न्युट्रलायझेशन होइल. कारण त्याला असतं. उजवं स्वाधिष्ठान व नाभीवर बर्फ वापरा. योग्य त्या चांचण्या घेऊन नंतर गरज असेल तर साखर खाणे टाळा.

हार्ट अटॅकस :

जास्त कार्यक्षम आणि निष्क्रिय किंवा सुस्तावलेलं हृदय उजवीकडील लोकांचं हृदय जास्त कार्यक्षम असतं. अशावेळी हृदय बंद पडूं शकतं. मुख्यतः खूप तरूण तयांत असं होऊ शकतं. कारण त्यांचं चित्त बाहेर जास्तच असतं. त्यामुळे त्यांचा आत्मा बाहेर जातो. त्यांच्या अतिशय भौतिक स्वभावामुळे आत्म्याकडे लक्ष नसतं. जास्त कार्यक्षमता, कुटुंबाविषयी अतिशय काळजी, भविष्याबद्दलचा जास्त विचार,

यामुळेदेखील हे होऊ शकते. हृदय जास्त रक्त पंप करूं लागतं. आणि स्वतःचं काम वाढवून घेतं. त्यामुळे ते दमतं. त्याशिवाय चित्तही आत्म्याकडे नसतं. सुस्तावलेलं हृदय - या प्रकारचे लोक अनेक प्रकारचे मंत्र घेतात आणि प्रथम त्यांची डावी विशुद्धी खराब करतात. तंबाखू, सिगरेट ओढून डाव्या विशुद्धीवर अडचणी निर्माण करतात. त्यामुळे हृदयाचं पंपींग कठीण होतं, त्यामुळे हृदय दमतं कारण, ते पंप करू शकत नाही. डावी विशुद्धी फार जास्त झाल्याने सुस्तावलेलं हृदय तुम्हाला अंजायना देतं. हे दोन प्रकारचे हार्टअटॅक असतात. पहिल्या प्रकारासांठी पोटावर आणि उजव्या बाजूच्या हृदयावर बर्फ ठेवून उपचार करता येतात. शिवाय डावीकडून उजवीकडे घ्या. पाण्यांत बसा. प्रकाश अजिबात वापरूं नका. अंधारांत झोपा. जास्त घरामध्येच रहा. पूर्ण विश्रांती घ्या आणि वारंवार म्हणत रहा. "मी आत्मा आहे." "देवा, कृपा करून मला क्षमा कर." दुसऱ्या प्रकारावर उपचार म्हणजे, त्याला म्हणायला सांगायचं, "आई, तूच माझा बीज मंत्र आहेस तूंच मांत्रिकही आहेस." आणि हेसुद्धां कीं, "मी दोषी नाही" आणि म्हणा, "देवा, मी सर्वांना क्षमा केली आहे." त्यामुळे सर्व दुखापती नाहीशा होतात. डावी बाजू स्वच्छ करण्यासांठी प्रकाश व अग्नी वापरा.

अस्थमा : दमा

बहुतांशी डावीकडील सायकोसोमॅटिक रोग. कधीकधी तो उजवीकडचा सुद्धां असूं शकतो. त्या लोकांमध्ये, जे अगदी शुष्क असतात, इतरांवर दबाव टाकण्याचा प्रयत्न करतात. त्यांच्या पेरिटोनीयमचा शुष्कपणा फार जास्त असतो. बहुतेकवेळा तो उजव्या हृदयाकडूनही येतो. - ज्यांचे वडिल मृत्यु पावले आहेत किंवा तुम्ही स्वतः चांगले पिता नसता, किंवा तुमच्यामुलाला छळलं असेल, किंवा स्वतःबद्दल तुम्ही दुःखी उदास, असाल. ते कोणत्याही प्रकारच्या जुळवणीनुसार असतं.

खाणं - डाव्या बाजूसांठी, चरबीयुक्त खाणं (फॅट) खाल्ली तर ते वाईट कारण चरबी ठेवली जाते. आणि ती अभिसरणासांठी (सर्क्युलेशन) सांठी मिळत नाही. बारीक लोकांमध्ये ती वापरली जाते त्यामुळे ते चरबी खाऊ शकतात. पण लठ्ठ लोकांसाठी त्यांनी चरबी फक्त नाकांत घालायला तूप, कानांत घालायला तेल अशी वापरावी लोकांना डोक्यावर तेलाने मसाज करणं चांगलं. बारीक लोकांनी गोल्डन आमला हेअर ऑइल' ने मसाज करावा. त्यामुळे ते थंड होतात.

दमा हा सायकोसोमॅटीकही आहे. जेव्हां तुमचं लिव्हर (यकृत) सुस्तावलेलं असतं. तेव्हां तू कमकुवत होतं.

आर्टकिरिया

रोगमुक्त होण्यासांठी गेरू वापरा. तो एका दगडावर घासा आणि तुमच्या मुलाला मधामधून द्या. (थोड्याशा प्रमाणांत) मोठ्या माणसांनाही. वृद्ध लोकांसांठीपण तो चांगला कारण, त्यामध्ये कॅल्शीयम असतं. आणि सोल्युबल (विरघळणारं) कॅल्शीयम लावण्यासांठी चांगलं. आणि मग कोणत्याही काळ्य रंगाने ते झांका. या प्रश्नाचं उगमस्थान असतं डावी नाभी. असं पहा, लिव्हर सुस्तावलेलं असतं त्यावेळी डावी नाभी सुस्तावते. ती व्यक्ति स्वतःच्या शक्त्या वापरत नसते. त्यामुळे लिव्हर सुस्तावतं. जे डाव्या नाभीमुळे जास्त वाढतं.

उपचार : परत डावीकडेच. कुठल्यातरी काळ्या गोष्टीने झाकणं बरं म्हणजे त्याला ऊब दिली जाईल. ती एक प्रकारची ॲलर्जीच आहे, बहुतेक ॲलर्जीचं कारण म्हणजे थंडमधून गरम गोष्टीत जाणे. उदा. थंड पाण्यांत आंघोळ करून वरून गरम पाणी घेणे, कॉफी घेऊन नंतर ताबडतोब थंड पाणी पिणे. या अचानक बदलामुळे शरीरयंत्रणा त्याच्याशी जुळवून घेऊ शकत नाही. डाव्या नाभीच्या भागांत स्प्लीन (प्लीहा) येते. स्प्लीन ही स्पीडोमीटरही आहे आणि जुळवून घेणारीसुद्धां आहे, जेव्हां ती जुळवून घ्यायला जाते तेव्हां, त्या अचानक बदलामुळे ते व्यवस्थित होत नाही आणि प्रश्न उद्भवतात (आर्. बी. सी.) चा लाल रक्तपेशीचा प्रवाह कमी वा जास्त करण्यास अचानक आपल्या शक्त्या बदलाव्या लागतात. त्यामुळे स्प्लीन वेड्यासारखी वागूं लागते. जी लोकं अत्यंत घाईत असतात त्यांना रक्ताचा कर्करोग (कॅन्सर) होण्यास हे मूळ कारण आहे.

ज्यावेळी मागची आज्ञा कार्य करीत असते तेव्हा तुम्ही सुस्तावलेल असतां आणि जेव्हां पुढची आज्ञा काम करीत असते तेव्हां तुम्ही जास्त कार्यक्षम होता शरीरामधील केमिकल्सचं संतुलन आज्ञेमधून होतं. आणि म्हणूनच तुम्ही नेहमी निर्विचार जाणीवेमध्ये असलं पाहिजे. डावीकडचे लोक असे असतात की, ते स्वतःला त्रास करून घेतात. उजवीकडचे लोक दुसऱ्यांना त्रास देतात. डाव्या बाजूकडचे लोक असतात त्यांच्या शरीराला वेदना होतात आणि ते त्रास सहन करतात. उजवीकडचे लोक इतरांना वेदना देतात आणि त्यांच्या ते लक्षांतही येत नाही. त्यामुळे या उजवीकडच्या लोकांना लिव्हर सिरोसिस आणि डोळ्याचे प्रश्न येऊ शकतात.

शक्ति हा डावीकडचा गुण आहे. श्रद्धा मध्यांतील डावी बाजू अतिशय मनोहर आहे. जोपर्यंत तुम्हाला वेदना जाणवत नाहींत तोपर्यंत. नंतर तुम्ही भरकटू लागता. कांही लोकांच्या बाबतीत भक्तिमध्ये हे घडतं.

जेव्हां मी बोलते त्यावेळी प्रत्येक शब्द हा मंत्र असतो जेव्हां मी बोलू लागते त्यावेळी लोक ठीक होऊ लागतात.

आतां सर्व प्रकारचे लोक वर येऊ लागले आहेत. कांही फार लवकर वर येऊ लागले आहेत. जोपर्यंत माझा संबंध येतो, त्यांनी देवी म्हणून बाजूला ठेवलं आहे. आणि माझ्यापर्यंत कोणी पोहोचूं शकत नाही. आतां तुमच्यापैकी एकजणच असेल जो उभा राहिल, त्याला लोक बघतील आणि सहजामध्ये येतील तो सगळ्यांत चांगला मार्ग आहे. कांही लोकांना नुसतं येऊ द्यायचं. आणि हीच खेळी आहे.

बऱ्याच लोकांनी त्याला वैयक्तिक केलं आहे. या बाबतीमध्ये माझ्या कुटुंबात काय चाललं आहे; इतरांचं काय चाललं आहे, मुंबईला

काय चालले आहे वगैरे त्यांना समजावून घ्यायचं असतं. सहजयोगी खूप प्रामाणिक, कनवाळू, मेहनती, चांगल्या स्वभावाचे आणि शांत स्वभाव असणारे असतात. हे तयार होण्याच्या प्रक्रियेमध्ये त्यांच्या स्वभावाने नवीन पातळी गांठली आहे. तुमच्यापैकी प्रत्येकाने त्यासाठी झटलं पाहिजे. इतरांची जास्त काळजी बाळगतां नये. जेव्हा त्या स्थितीला सामोरे जाता तेव्हां, त्या स्थितीची चांचणी होते. ही परिस्थितीची वेळ आहे. पूर्ण विवेकाने स्थिती एकत्र केली पाहिजे.

चक्रांमध्ये देवता आहेत. कुंडलिनी जेव्हा उत्थान पावते तेव्हां बीप्रमाणे ती त्यांना जागृत करते. एकदां कां त्या जागृत झाल्या की त्या कार्यान्वित होतात. त्यांचं कार्य, काय काय कार्यान्वित करायचं ते, त्यांना माहित असतं. जसं कांही त्यांची तिथे नेमणूकच झाली आहे. तुमच्या उत्क्रांतीमध्ये विविध पातळींवर तुम्ही त्या देवतांना मिळवलं आहे. त्यामुळे त्या जिथे प्रस्थापित झाल्या आहेत तिथे त्या कार्य करतात. बी घ्या. ती स्थूलांत आहे. तिचं पोटेन्शिअल आहे झाड बनणं. आणि त्या झाडाचं अनेक झाडं बनणं. हे पोटेन्शिअल सूक्ष्म सूक्ष्मतर, सूक्ष्मतम आहे. त्याचं स्वरूप स्थूल आहे. पृथ्वीतत्त्वाचं कॉजल - मुलतत्त्व सुगंध हे आहे. त्यामुळे जेव्हां ते कुंडलिनीला जागृत करतं, त्यावेळी ते कॉजललाही स्पर्श करतं. जसा तुम्हाला सुवास येतो. आत्मसाक्षात्काराचं कॉजल शुद्ध इच्छा हे आहे. माणूस हा तीन पोटेन्शीअल्सचा (तत्त्व)बनला असतो - स्थूल, सूक्ष्म आणि आत्मसाक्षात्काराचं कॉजल म्हणजे शुद्ध इच्छा, स्थूल व सूक्ष्म शरीरांना प्रकाशित करते. ज्यावेळी तुम्ही पृथ्वीमध्ये बी घालता, पृथ्वी त्या बीला प्रकाशित करते व त्याला पोटेन्शिअल देते. त्याप्रमाणे तुमच्यामध्ये कुंडलिनी ही पृथ्वीमातेसारशी आहे. 'ती उठते व ही पोटेन्शीअल पातळी तुमच्या बीजाला देते. प्रत्येक गोष्टीचं कॉजल वेगळं असतं. आणि प्रत्येक चक्र त्याच्या स्वतःच्या कॉजलप्रमाणे कार्य करतं. अडचण हीच कीं आपण स्थूल रूपांतही समजूं शकत नाही. आतां एक स्थूल पातळीवरची गोष्ट घ्या तुम्ही एका बिंदूपर्यंत पोहोचला, जिथे तुम्ही अॅटम घेता. त्याला एक न्यूक्लिअस (केंद्रबिंदू) असतो ज्यात प्रोटॉन, न्यूट्रॉन, मिसोटॉन असतात. आता जर तुम्ही हेलियमगॅससारखा अॅटम थंड केला तर, अॅटमस, सामुहिक होतात. मग मिसोटॉन स्वतःहून करतो ते पण सामूहिक होतात. जर,एका ठराविक तपमानापर्यंत थंड केले तर. तर हे पोटेन्शिअल स्थूल, स्थूल तर गोष्टींमध्येसुद्धां असतं. हे शास्त्रीयदृष्ट्या सिद्ध करतां येते. पण जेव्हां आपण मानवप्राणी होतो, आपण जिवंत क्रियेबाबत बोलत आहोत. मानवप्राणी म्हणजे स्थूलामधलं सर्वांत मोठं प्रकटीकरण आहे. आतां अंतर्यामीची वाढ झाली पाहिजे. स्थूल पातळीवर त्याचं पूर्ण प्रकटीकरण झालं आहे. एखादं बी जे स्थूलांत पूर्ण तयार झालं आहे जिवंत आहे. ते घ्या आणि मग पृथ्वीमातेमध्ये ठेवा. काय होइल?

आपल्या पूर्ण अस्तित्त्वामध्ये सूक्ष्मतर आणि सूक्ष्मतमाचीदेखील प्रतिकृति आहे. त्याचं पोटेन्शिअल कुंडलिनी ही आहे. कुंडलिनी पृथ्वीमातेच्या तन्मात्रेचं प्रतिनिधीत्त्व करते; विराटाची तन्मात्रा आहे सामुहिकता. सदाशिव आणि आदिशक्तिचे आपल्यामध्ये प्रतिनिधीत्त्व करतात आत्मा आणि कुंडलिनी : (ते तन्मात्रेच्या पलिकडे आहेत. खरं म्हणजे ते तन्मात्रेचं स्फुरण करवतात)

उदा : एक मेणबत्ती लावा. तुमचे हात तिच्याकडे ठेवा. माझ्या फोटोसमोर ती जागृत होइल. मेणबत्तीचं पोटेन्शिअल आलं आहे. म्हणजे फोटोने तिचं पोटेन्शिअल जागृत केलं आहे. आतां ती निगेटिव्हिटी जाळून टाकू शकते. याच्या परिणामामुळे भिंत काळी होतांना तुम्ही पाहिलं आहे.

प्रत्येकाला तन्मात्रा असते जी सर्व पोटेन्शिअल ठेवते. तन्मात्रेपासून स्थूलापर्यंत जातांना तुम्ही सूक्ष्मांतून जाता. आतां काय होतं, जशी पृथ्वीमातेची तन्मात्रा सुगंध आहे. या सुगंध आहे. या सुगंधामधून सर्व फुलं आणि झाडं येतात. त्याप्रमाणे मानवप्राण्याला कार्बन आहे. पृथ्वीमाता कशी काय स्वतःमध्ये जळते आणि स्वतःमध्ये हा कार्बन त्या उष्णतेतून तयार करते. हा कार्बन अमायनो अॅसिड तयार करणारा तुमच्यामधला एक अविभाज्य भाग बनतो. तर तन्मात्रेच्या पातळीवर पृथ्वीमातेला माहित असतं. तुम्ही काय आहांत ते तिला माहीत असतं, शक्तीच्या रूपामध्ये निराकार ही तन्मात्रा आहे. तर दैवतं ही तिला वापरणारी साकार आहेत. त्यांना ते कसं वापरायचं हे माहीत असतं. मध्यमज्ञासंस्थेतून स्थूलामध्ये त्याचं प्रदर्शन होतं.

साकार हा कर्ता आहे. तन्मात्रा ही त्या विविक्षीत दैवताची शक्ति आहे; अप्रकट असलेली शक्ति. पण जेव्हां दैवतं जागृत होतात; त्यावेळी त्यांच्या शक्त्यासुद्धां जागृत होतात. ही जिवंत क्रिया आहे. आणि ते कसं काय कार्यान्वित होतं त्याचं स्पष्टीकरण तुम्ही देऊं शकत नाही. आतां अर्भक पहा. ते कशाप्रकारे रूप घेतं, त्याला कोण मार्गदर्शन करतं, तिथे कांहीतरी बुद्धी असली पाहिजे. कोण ते करतं, कोण सांभाळतं, कोण योजना करतं? आतां मी स्त्रीरोगतज्ज्ञाला प्रश्न करते. शरीरामध्ये बाहेरचा कोणताही पदार्थ बाहेर फेकला जातो तर अर्भक कां नाही फेकलं जात? मला उत्तर द्या. कांहीतरी त्याचं पोषण करतं, काळजी घेतं. आणि मग योग्यवेळी ते बाहेर टाकतं. ते आंतमध्ये वाढतं पण आईला त्रास देत नाही. खरं, तर तिच्या अस्तित्त्वामधील शक्तित झालेल्या बदलामुळे आईचा चेहरा बदलतो. तर आईला हे सौंदर्य कुठून लाभतं? - पहा तर, काळजी घेणं - पोषण करणं - त्याची परिपूर्णता पहाणं इतकं आश्चर्यजनक आहे, नाही कां?

आपल्या बुद्धीला अंतच नाही असं आपल्याला वाटत. पण देवाच्या साम्राज्यांत रहातांना एक छोटसं बी आलं, आणि त्याच्या शेवटी एक छोटीशी पेशी आली; या पेशीमध्ये असणारी बुद्धी जर माणसाकडे आली तर सहजयोग पूर्णपणे प्रस्थापित होइल. ती सरळसरळ तिची स्वतःची दिशा बघू शकते. तिला दगड दिसतो. त्याच्याबरोबर ती झगडत नाही, त्याच्या बाजूने वळसा घालून जाते त्याला बांधून घेते. त्यामुळे नंतर जेव्हां तो मोठं झाड होइल त्यावेळी त्या दगडाचा पाया घालण्यासाठी उपयोग होइल. मग हळूहळू सावकाश ते पाण्याकडे पोहोचतं. पाण्याची पातळी त्याला कुठे मिळणार आहे याविषयी त्याला कांहीच जाणीव किंवा

पूर्वसूचना नसते. एकदा मी कुंभारमाशीवर प्रयोग केला. आमच्या घरामध्ये ती स्वतःचं घर बांधत असतांना मी तिला रंग दिला आणि कसातरी तो रंग तिच्या पंखांवर आला. एके दिवशी मी एका दूरच्या जागी गेले. तिथे तीच माशी आली होती. मग ती परत आमच्या घरी दिसली. हे सर्व मार्ग तिने कसे काय घेतले? तिच्यामध्ये कांहीतरी लोहचुंबक असलं पाहिजे.

तरूणपक्ष्यांना ऑस्ट्रेलियामधून सैबेरियामध्ये त्यांची घरं कशी मिळतात? असं पहा, ते सगळे सामुहिकतेमध्ये असतात. आणि पूर्णपणे एकत्र आलेले आणि ते सर्व एकत्र हिंडतात. हे सर्व पशूंच्या 'पाश' स्थितीमध्ये असतं.

पण आपण मानवप्राणी आतां पशू नाही. आपण स्वतंत्र आहोत. आतां या स्वतंत्रतेच बरचंस हरवलं आहे आणि गेलं आहे. नंतर मानवप्राणी प्रस्थापित होत आहे. ॲडम आणि ईव्हच्या पातळीवर हे स्वातंत्र्य दिलं गेलं होतं. ते जर समंजस असते तर कांही प्रश्न उद्‌भवला नसतो. आतां या स्वातंत्र्यासाठी फार मोठी किंमत मोजावी लागते. आतां नुसतं पहा. या स्वातंत्र्यामध्ये काय काय घडतं आहे. पण हल्ली सगळं कार्यान्वित होत आहे. ही जिवंत क्रिया सायन्सने समजावून सांगता येत नाही. शास्त्रज्ञ देवतांचा स्वीकार करणार नाहीत. तेव्हां, त्यांच्याविषयी काळजी करूं नका. आपल्यामध्ये शास्त्रज्ञ नसले तर काय होणार आहे? आपल्याला कांही चुकल्याचुकल्या सारखं वाटणार नाही.

शास्त्रज्ञांसांठी सर्वांत महान गोष्ट म्हणजे स्वतःच पहाणे. त्यांना कांहीही स्पष्टीकरण देतां येणार नाही. जसं सल्फरडायऑक्साइडला व्हायब्रेशन्स आहेत, जी इलेक्ट्रोमॅग्नेटीक आहेत. - सिमेट्रीक आणि आयसोसिमिट्रीक. ते फक्त त्यांना जे दिसतं ते सांगतात. सहजयोगामध्ये त्यांना ते काय आहे ते दिसेल. तुम्ही त्यांना वस्तुस्थिती द्या आणि त्यांना तिचा अनुभव घेऊं दे. शास्त्रीयरित्या सगळं कांही तुम्ही त्यांना कसं दाखविणार?



१) कधी विकत घेऊ शकता तुम्ही
आकाश?
कधी विकत घेऊ शकता तुम्ही
पाऊस आणि वारा?
श्री आदिशक्ति माताजी निर्मलादेवींनी मला सांगितलं, ही पृथ्वी
आपली माता आहे,
आणि सागर आपला पिता,
प्रत्येक नदी, प्रत्येक दरी, प्रत्येक पर्वत
वाटतो आहे प्रतिबिंबीत
सर्वत्र पसरलेलं आदिशक्तीचं प्रेम.

२) श्री गणेशांनी मला म्हटलं,
झाडांमधून वाहणारा रस आहे नां, ते आहे रक्त,
माझ्या नसातून सळसळणारं,
पृथ्वीमातेच्या उदरांतून झाला आहे माझा जन्म आणि तूं?
तूं आहेस माझाच भाग,
आणि फुलांचा मोहक गंध
आहे, माझाच प्रसाद.

३) श्री ब्रह्म देवांचा आवाज मला म्हणाला,
चकाकणारं सागराचं पाणी, नुसतंच पाणी नव्हे
ते आहे रक्त, तुझ्या आजोबांच्या पूर्वजांचं,
तलावाच्या स्वच्छ पाण्यातलं प्रत्येक प्रतिबिंब
सांगतय गोष्ट
निर्मितीची.
पाण्याची कुजबुज आहे,
नाद अनंताचा.
देवताच आहेत नद्या, जीवन जगवणाऱ्या
समृद्धी आणणाऱ्या
आपली नाव चालवणाऱ्या,
मुलांना भरवणाऱ्या
त्यांना ठेवा स्वच्छ आणि करा आदर.

४) श्री हनुमानांचा आवाज मला म्हणाला,
हवा आहे फार मोलाची,
प्राण-ओझोन यांनी भरलेली.
वैकुंठाहून येणारा वाराच
पहिला श्वास घेतोय.
आणि स्वीकार करतो आहे
शेवटच्या श्वासाचा.
पवित्र आणि स्वच्छ ठेवली पाहिजे हवा
ते आहे स्थान
जिथे आपण स्वीकार करूं शकू.
आदिशक्तिचा शीतल वारा.

५) आपण आलो आणि गेलो
तरी दऱ्याखोऱ्यात पर्वतात
असेल का श्वास, होलिस्पीरिटचा? आदिशक्तिचा?
समुद्र किनारा आणि जंगल यांना
अजून भेट देत असेल कां होलिग्रेल?
ही पृथ्वी आपली नाही
आपण आहोत..... पृथ्वीचे.

६) आदिगुरुंचा आवाज मला म्हणाला,
शिकव तुझ्या लेकरांना
सहजयोगाचं ज्ञान.
पृथ्वीमाता आहे आपली आई.
पृथ्वीवरची आपत्ती आहे,
सर्वांचीच.
पृथ्वीमातेच्याच साऱ्या लेकरांची
लक्षांत ठेव हा इशारा?
काय होणार आहे मग?
छुपे कोपरे रानाचे उध्वस्त होतील तेव्हां?
जेव्हा धुक्याचे मेघ आच्छादून टाकतील. गिरीकंदरांतील दृश्यं,
जेव्हा नद्याचं पाणी रंग, घेइल, केमिकलसच्या कचऱ्याचा,
माशांचा गळा आवळेल, पक्ष्यांच्या श्वास अडकेल,
आणि नवं बांधकाम आणि ताबा घेण्याच्या उन्मादांत
हरपेल सारं काहीं
आपल्याकडे असलेलं.

७) श्री आदिशक्तिने एकत्रित केलंय
सारं कांही व्हायब्रेशन्सद्वारे
आपण काही निर्माण केलं
कांहीही जीवंत कार्य
आपण करतोय ते कार्य, फक्त मेलेलं,
आपल्यालाच मारून टाकणारं.
जिवंत कार्य करते आहे
फक्त
ती....आदिशक्ति !

८) आपण सारे सहजयोगी प्रेम करतोय. या पृथ्वीवर जसं
आपण प्रेम करताय
आपल्या दैवी आईवर श्री माताजींवर घेऊया आतां आण
आपण ही पृथ्वी, ही हवा या नद्या सातत्याने राखू नांवाने
श्री आदिशक्तिच्या आमच्या लाडक्या निर्मलमातेच्या जिने
दिलाय आम्हाला पुनर्जन्म.